मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी ७

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

जून १९५४

किंमत आठ आणे

संपादक

पु. य. देशपांडे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रदेश शाळाखात्याकडून लायब्ऱ्यांसाठी मंजुरी मिळालेलें

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

श्री. काळकी दफ्तरी ग्रंथालय विदर्भ साहित्य संघ, नागपूर

युगवाणी

वर्ष ९ वें] जून १९५४ [अंक ३ रा

संपादक-मंडळ

ग. त्र्यं. माडखोलकर
के. ज. पुरोहित
पां. ब. गाडगीळ
सौ. कुसुमावती देशपांडे
गो. रा. दोडके
ना. रा. शेंडे.

या अंकांत

आल्बर्ट श्वाईट्झर — सौ. विमलाबाई देशपांडे

नट आणि नटी — वा. वा. भोळे

'जिप्सी'चें अंतरंग — वा. रा. कान्त

मराठी वाङ्मयाची इंग्रजींतील अनुचित ओळख — राजशेखर

कविता — म. म. देशपांडे, शिरीष, गणेश पाठक, वसंत वऱ्हाडपांडे, वसंत निनावे, निशिकांत करकरे.

शिवाय

संघवार्ता

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या अंकांतील लेखक

सौ. विमलाबाई देशपांडे—'निर्माल्य-माला' या संग्रहामुळें एकाकाळीं कवयित्री म्हणून ओळखल्या जात असत. परंतु विमलाबाईंची लेखणी राजकीय, सामाजिक आणि वाङ्मयीन चर्चेतच जास्त रमते. 'भवितव्य' साप्ताहिकांत त्यांनी क्वचित् नांवाखाली आणि बहुधा टोपणनांवाखाली भरघोस लिखाण केलेलें आहे. विमलाबाईंची भाषा बाळबोध वळणाची पण प्रासादिक आणि अकृत्रिम आहे.

म. म. देशपांडे—नवोदित कवींत अग्रेसर. यांच्या कविता 'युगवाणी' 'सत्यकथा' 'सुषमा' इत्यादि मासिकांतून प्रसिद्ध होत असतात. काव्यसंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहे.

'शिरीष'—नवोदित कवि. काव्यरचनेप्रमाणेंच लघुनिबंध, नवलिका लिहिण्यांत यांचा हातखंडा आहे.

गणेश पाठक—उदयोन्मुख कवि. यांच्या कविता 'युगवाणी' 'सुषमा' 'नवभारत' 'रोहिणी' 'वाङ्मय-शोभा' या मासिकांतून प्रसिद्ध होत असतात.

वसंत वऱ्हाडपांडे—विदर्भातील प्रसिद्ध तरुण कवि. लघुकथा- लेखनांतहि त्यांनी कौतुकास्पद यश मिळविलेलें आहे.

वसंत निनावे—अल्पावकाशांत पुढें आलेले तरुण कवि. यांच्या उत्तमोत्तम कविता 'युगवाणी'त प्रसिद्ध झाल्या आहेत.

निशिकान्त करकरे—ग्वाल्हेरचे तरुण कवि. यांच्या कविता 'युगवाणी' 'म. सा. पत्रिका' इत्यादि मासिकांतून प्रसिद्ध होत असतात.

वा. वा. भोळे—
वा. रा. कान्त—
} 'मे'च्या अंकांत परिचय पहावा.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

वर्ष ९ वें जून १९५४ अंक ३ रा

संपादकीय

मध्यप्रदेश शासन साहित्य परिषद्

मध्यप्रदेश सरकारने 'म. प्र. शासन साहित्य परिषद्' या नांवाची एक समिति स्थापन करून हिंदी व मराठी साहित्याला आणि साहित्यिकांना उत्तेजन देण्याच्या हेतूने एक कायमची योजना केलेली आहे. विदर्भ साहित्य संघाने कांही वर्षांपूर्वी साहित्य व कला यांच्या संवर्धनासाठी, शासनांत एक स्वतंत्र विभाग काढून तो एका मंत्र्याच्या नियंत्रणाखाली सतत चालविण्यांत यावा, अशा आशयाचा ठराव केला होता व तो प्रादेशिक मंत्रीमंडळाकडे रीतसर पाठविलाहि होता. एवढेंच नव्हे, तर तत्कालीन शिक्षण मंत्री, पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांच्याशीं, संघाच्या कांही प्रमुखांनी सविस्तर चर्चा करून या गोष्टीचें, सामाजिक जीवन उन्नत व प्रगतिशील करण्याच्या दृष्टीने किती महत्व आहे, हें त्यांना पटवून देण्याचा खास प्रयत्नहि केला होता. या चर्चेचा निष्कर्ष म्हणून एक 'हिंदी – मराठी साहित्य परिषद्' प्रस्थापित करण्याची कल्पना मूळ धरूं लागली होती. या मूळ कल्पनेचें अधिष्ठान मात्र अगदीं वेगळें होतें. साहित्य व कला यांच्या क्षेत्रांत शासनाचें नियंत्रण यत्किंचित्हि असतां कामा नये, या तत्वाला अनुसरून हिंदी व मराठी साहित्यसंघांचे प्रतिनिधी आणि कांही ख्यातनाम साहित्यकार, ग्रंथकार व कलावंत यांची एक स्वतंत्र पण सरकारमान्य अशी समिति स्थापन करणें, हा त्या कल्पनेच्या मागें मुख्य हेतु होता.

साहित्य कीं शासन ?

ही मूळ कल्पना पं. मिश्रजींच्या मंत्रिपदत्यागामुळे मागें पडली, रेंगाळत राहिली, आणि आता 'म. प्र. शासन साहित्य परिषद्' या रूपानें ती कार्यान्वित झाली आहे. या परिषदेंत 'साहित्या'पेक्षा 'शासना'लाच अधिक प्राधान्य देण्यांत आलें आहे, असें दिसतें. 'विदर्भ साहित्य संघ' आणि 'हिंदी साहित्य संमेलन' या दोन प्रातिनिधिक प्रादेशिक साहित्य संस्थांच्या अध्यक्षांना या परिषदेंत मानाचें स्थान देण्यांत आलेलें आहे, ही विशेष अभिनंदनीय घटना आहे. त्याचप्रमाणें नागपूर व सागर या दोन मध्यप्रदेशीय विश्वविद्यालयांचे उपकुलगुरू यांना या परिषदेवर घेण्यांत आलें आहे,. हीहि समाधानाची गोष्ट आहे. शिवाय, हिंदी व मराठी साहित्याच्या प्रत्येकी दोन गैरसरकारी प्रतिनिधींचा या परिषदेंत समावेश करण्यांत आला आहे. ही देखील महत्त्वाची गोष्ट आहे. पण एवढ्यावरच ही यादी थांबली असती आणि फार तर शिक्षणमंत्रि अथवा मुख्यमंत्री यांना या समितीचें अध्यक्षपद देऊन ही परिषद् एकूण नऊ सदस्यांचीच बनली असती तर शासनापेक्षां साहित्याला अधिक मान दिल्यासारखें झालें असतें आणि जनतेचा विश्वास या परिषदेला अधिक मोठ्या प्रमाणांत संपादन करता आला असता. साहित्य व कला या क्षेत्रांतील केवळ आपल्या गुणांमुळे व भरीव कार्यामुळे मान्यता पावलेल्या सज्जनांच्या स्वतंत्र धोरणाने या परिषदेचें संचालन झालें असतें तर साहित्य आणि कला यांना प्रेरक व अत्यावश्यक असलेल्या स्वातंत्र्याच्या मूल्याची जोपासना केल्याचें श्रेय आमच्या लोकनियुक्त सरकारच्या पदरांत पडलें असतें. या तत्वाचें महत्व सरकारच्या ध्यानांत आलें असतें तर हिंदी व मराठी साहित्यसंस्थांनी निवडलेले चार, व दोन विश्वविद्यालयांनी नियुक्त केलेले दोन व फार तर एक वा दोन सरकारने नियुक्त केलेले, सभासद, अशा प्रातिनिधिक व लोकतंत्रानुसारी तत्वाच्या आधारावर या परिषदेची उभारणी करण्यांत आली असती तर ती अधिक तत्वशुद्ध ठरली असती.

उत्तेजनाची योजना

असें जरी असलें तरी जें झालें आहे तें देखील अभिनंदनीयच आहे, यांत शंका नाही. या परिषदेच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सल्ल्यानुसार दरवर्षी साहित्याला उत्तेजन देण्यासाठी सुमारे एक लाख रुपये खर्च होणार आहेत. या एक लाखाच्या कल्पनेचे जनक आमचे वित्तमंत्री श्री. ब्रिजलालजी बियाणी आहेत, असें कळतें. साहित्य आणि वित्तमंत्रीपद यांचें साहचर्य विरळाच आढळून येतें. श्री. बियाणींच्या या साहित्यप्रेमाबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत.

या परिषदेने निरनिराळ्या वाङ्मयप्रकारांच्या कृतींना पारितोषकें देण्याची योजना जाहीर केली आहे. साहित्याला उत्तेजन देण्याचा उदात्त हेतु जरी या योजनेमागें असला तरी साहित्यिकांच्या वृत्तीची व प्रकृतीची तींत फारशी दखल घेतलेली दिसून येत नाही. पारितोषकाच्या प्रलोभनामुळे उत्तम साहित्य उदयास येत नसतें. अस्सल कलात्मक साहित्याला प्रेरक होणाऱ्या गोष्टी फार निराळ्या असतात. अशा स्वतंत्र व स्वयंस्फूर्तीनें उदयास आलेल्या आणि रसिकांनी तितक्याच स्वतंत्र व स्वयंस्फूर्त रीतीने गौरविलेल्या साहित्यकृतींचा आपणहून सन्मान करण्याचें धोरण या परिषदेनें अंगीकारलें असतें तर तें अधिक तत्वशुद्ध व परिणामकारक ठरलें असतें. जाहीर झालेल्या योजनेला बाध न आणतांहि आम्ही असें सुचवूं इच्छितों की, या परिषदेनें अद्यापहि हें धोरण अंगीकारावें आणि मध्यप्रदेशांतील हिंदी व मराठी भाषेतील नामवंत व सन्माननीय साहित्यिकांना त्यांच्या विशेष महत्वाच्या कृतींचा उल्लेख करून गौरवावें. असें करण्यांत साहित्य व साहित्यिक यांचा जो मान राखला जातो त्याला आमच्या मतें सांस्कृतिक दृष्ट्या फार मोठें मूल्य आहे. राज्यशासनाच्या अनेक व्यवहारांपैकीच साहित्याला उत्तेजन देणें हाहि एक व्यवहार आहे व तो सर्वसाधारण शासनपद्धति जशी असते त्याच पद्धतीने करणें आवश्यक व इष्ट आहे, अशी जर सरकारची कल्पना असेल तर ती फार चुकीची आहे, असें नम्रपणें पण स्पष्टपणें सांगणें आम्ही आपलें कर्तव्य समजतों.

*

मध्यप्रदेश शासन साहित्य परिषदेच्या घटनेबाबत वर मजकूर आलाच आहे. तिच्या घटनेंतील वैगुण्यें आम्ही दाखविलीं आहेत. ती जास्त लोकानुवर्ती कशी होईल या दृष्टीनें कांही सूचनाहि केल्या आहेत. आतां प्रत्यक्ष पारितोषिकें आणि त्यांची वितरणपद्धती यांच्याविषयीं विचार करावयाचा आहे. युगवाणीच्या गेल्या अंकांत १९५४–५५ आणि १९५५–५६ या सालांमध्यें कोणकोणत्या विषयांना पारितोषिकें दिलीं जाणार आहेत याविषयींचें निवेदन आलें आहे. १९५४–५५ या सालांत अकरा विषयांवरील ग्रंथांना पारितोषिकें मिळणार आहेत. आणि १९५५ ते ५६ या सालीं केवळ दोनच विषयांवरील ग्रंथांना तीं मिळणार आहेत. १९५४ ते ५५ या सालाकरितां जे विषय पुरस्कारार्थ ठरवले आहेत, सामान्यपणें त्यांच्याचपैकीं कांही आलटून पालटून वर्षावर्षाला ठेवले जातील. परंतु ही विषयसूचि अपूर्ण वाटते. कारण तींत चरित्रें, आत्मचरित्रें, प्रबंध, लघुनिबंध, प्रवासवर्णनें, रोजनिशी, बंगाली, गुजराथी, सारख्या भारतीय भाषामधील आणि परकीय फ्रेंच, जर्मन, रशियन, इंग्रजी वगैरे भाषांमधील ग्रंथांचीं भाषांतरें, शिल्प, चित्र, स्थापत्य कृतींचें कलात्मक रसग्रहण, यांना स्थान नाहीं. अर्थ हा कीं जे लेखक या विषयांवर ग्रंथरचना करतील त्यांना पुरस्कार प्राप्तच व्हायचा नाहीं. म्हणजे 'मध्यप्रदेश शासन-साहित्य परिषदे' मधील साहित्य या शब्दांतील अर्थाचा संकोच करावा लागेल. साहित्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने हा प्रकार सर्वथैव अनिष्ट आहे. एखादे वेळीं तर असेहि होण्याचा संभव आहे कीं उल्लेखिलेल्या विषयावर समाधानकारक ग्रंथ निर्माण व्हायचा नाहीं, आणि अनुल्लेखित विषयावर अप्रतिम ग्रंथ निर्माण होऊन तो परिषदेपुढेंहि यायचा नाहीं. कारण पारितोषिक देणारी मध्यप्रदेश शासन साहित्य परिषद आहे. आणि 'शासन' Pound of flesh म्हणजे Pound of flesh च समजते.

१९५५ ते ५६ सालाकरितां केवळ दोन विषय ठेवण्यांत आले आहेत. दोन्ही विषय संकलनात्मक स्वरूपाचे आहेत.ते कलात्मक आहेत किंवा नाहीत या विचाराची आवश्यकताच नाही. अशा प्रकारें कलात्मक, स्वयंस्फूर्त,स्वतंत्र अशा साहित्याच्या विकासाला अडथळा करणारी ही योजना आहे. एखाद्या विशिष्ट विषयावर ग्रंथरचना व्हावी अशी जर परिषदेची इच्छा आणि गरज असेल तर लेखकाला मोबदला देऊन तो लिहवून घ्यावा. अनेकांचे श्रम जिच्यामुळे वाया जातील अशी ही पारितोषिकाची योजना या ग्रंथाकरितां नको.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कारण अनेकांची कार्यशक्ति एका वर्षापुरती विशिष्ट विषयांकडे वळेल, ज्यांचें तें कार्य नव्हे-तेंहि वळतील आणि साहित्यनिर्मितीचें स्वरूप भाडोत्री होईल.

आणखी एक दोष या योजनेंत संभवतो.

कल्पना करा, १९५५–५६ सालीं एका लेखकानें कादंबरी लिहिली, एकानें नाटक लिहिलें, एकानें बालवाचकांकरितां कादंबरी लिहिली. पण या वर्षी तर या शाखामधील ग्रंथांना पारितोषिक नाहीं. परिणाम हा होण्याचा संभव आहे की ग्रंथांचें प्रकाशन थोपवून धरण्यांत येईल. आणि ज्या वर्षाला या विषयांना पारितोषिक जाहीर करण्यांत येईल त्यावर्षी एकदम, सगळं साहित्य बाहेर पडेल. फ्रेंच साहित्यांत हा प्रकार सारखा घडतो आहे. वर्षातून कादंबरीसाहित्याला बक्षिस मिळण्याचा जो काळ असतो त्याच्याअगोदर परीक्षकांच्या हातांत पडतील अशा रीतीनें त्यांचें प्रकाशन केलें जातें. परीक्षकांना वाचायलाहि वेळ मिळत नाहीं. वर वर्णन केलेली संभाव्य परिस्थिति केवळ काल्पनिक नव्हे.

हा सगळा प्रकार टाळता येतो. दरवर्षी मराठी आणि हिंदी साहित्यांत (मध्यप्रदेशांतील) प्रकाशित होणाऱ्या ग्रंथांची वर्गवारी करून निरनिराळ्या शाखांमधील सर्वोत्कृष्ट ग्रंथांना पारितोषिकें देणें. या योजनेनें 'परिषदे'ने आज ठरवलेल्या कार्यप्रणालीमुळें जे दोष निर्माण होतात ते टाळले जातील.

भाषांतरित ग्रंथांना जीं पारितोषिकें मिळावयाचीं आहेत त्यांच्याहि बाबतींत विचार करणें आवश्यक आहे. परस्परांच्या साहित्याचा, त्या साहित्यामागील विचारांचा, विचारसंघर्षांचा आणि लेखनशैलींचा परिचय व्हावा हा भाषांतरित साहित्यामधील हेतु असतो. भारतीय भाषांमधील साहित्याचें आजचें स्वरूप ज्ञात होणें ही साहित्यकारांच्या दृष्टीनें महत्वाची गोष्ट होय. पारितोषिक देतांना परीक्षकांच्या अंतःकरणांत हा विचार निश्चितपणें असावा, ग्रंथ मूळ भाषेंतील अद्ययावत्, प्रातिनिधिक आहे किंवा नाही ? हिंदी अथवा मराठी भाषेमध्यें बंकिमचंद्र, रविबाबू आणि शरदबाबू यांचें बरेंचसें साहित्य प्रकाशित झालें आहे. आणि एकेकाळीं भाषांतरित झालेलें साहित्य आज पुन्हा भाषांतरित होतें आहे. परंतु आजच्या वंगसाहित्याची ओळख मात्र करून देण्याचे प्रयत्न होत नाहीत. अशाच ग्रंथाला पारितोषिक मिळावें, कीं जो ही अट पूर्ण करील. अशा प्रकारच्या भाषांतरांच्या अभावीं पुरातन ग्रंथांच्या भाषांतरांचा विचार व्हावा. भाषांतरित ग्रंथाकरितां कांही विशिष्ट भाषांमधील साहित्याचाच विचार करण्यांत आला आहे. कोणतीहि भाषा, मग ती भारतीय असो अथवा परकीय असो, तिच्यामधील भाषांतरित ग्रंथ पुरस्कारार्ह मानला जावा. वर सांगितलेली अट पूर्ण करणारा तो असला म्हणजे झालें.

परिषदेचा निर्णयकालहि जाहीर होणें आवश्यक आहे.

साहित्यकारांना पारितोषिकें देण्याची योजना अभिनंदनीय आणि साहित्याच्या विकासाला अनुकूल अशी आहे. म्हणूनच ती दोषरहित व्हावी या दृष्टीनें हा खटाटोप केला आहे. केवळ दोषदिग्दर्शन हें या टिप्पणीचें कार्य नव्हे.

रंगभूमीचें भवितव्य

रंगभूमीच्या पुनरुज्जीवनाविषयीं अलीकडे बरीच चर्चा चालते. नट, नाटककार, रसिक, धंदेवाईक इत्यादि अनेक प्रकारचे लोक अनेक मार्ग सुचवीत असतात व अडचणींचें निवेदन करीत–असतात. श्री. बाबूराव पेंढारकर यांनी 'नव नाट्य मंदिर' हीं संस्था स्थापून हें पुनरुज्जीवनाचें कार्य प्रत्यक्षपणेंच अंगावर घेतलें आहे हें प्रसिद्ध आहे. त्यांनी एका निवेदनांत आपल्या सहा महिन्याच्या अनुभवाचें सार, आंकड्यानिशी दिलें आहे. तें मोठें लक्षांत घेण्याजोगें आहे. रंगभूमीच्या उत्कर्षामधील सर्वांत मोठ्या व्यावहारिक अडचणी म्हणजे करमणुकीवरील कर आणि नाट्यगृहांचा अभाव. करमणुकीवरील करामुळे नाट्यप्रयोगांची किती गळचेपी होते, हें पेंढारकरांनीं दिलेल्या आंकड्यांवरून पूर्णपणें सिद्ध होतें. त्यांच्या मुंबई प्रांतांतील २७ प्रयोगांचें एकूण उत्पन्न रु २२४६७ झालें. तितक्याच प्रयोगांचे मध्यप्रांतांतील उत्पन्न जवळजवळ तितकेंच, रु. २२७१७ झालें परंतु मुंबईप्रांतांत करमणूक कर रु. ५५३६/–द्यावा लागल्यामुळें त्यांना एकूण रु. २९५७/ चा तोटाच आला तर मध्यप्रांतांतील दौऱ्यांत ३५७४ रु. चा फायदा झाला. मध्यप्रांतांतील

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नक्याचें प्रमाण सगळीकडे राहिलें तरच 'नाटयमंदिर' सारख्या संस्थेला जिवंत राहणें शक्य आहे; हें उघड आहे. मध्यप्रांतांत तरी ही परिस्थिति निर्माण होण्यास केवळ विदर्भ साहित्य संघाचे प्रयत्न कारणीभूत झाले, हें सर्वविश्रुत आहे. रंगभूमीची दुसरी मोठी अडचण नाटयगृहांच्या अभावाची. त्याहि बाबतींत विदर्भ साहित्य संघाचा कसून प्रयत्न चालू आहेच. भारतीय सांस्कृतिक जीवनाचा हा घटक कार्यक्षम व्हावा म्हणून खरोखरी प्रत्येक सुबुद्ध व्यक्तीने खटपट करणें अवश्य आहे. प्रभावी नाटकाचा परिणाम इतर वाङ्मयप्रकारां पेक्षां संख्येच्या दृष्टीनें एक प्रकारें कमी व्यापक असला तरी त्याचा परिणाम अधिक उत्कट व अविस्मरणीय असतो. त्याचप्रमाणें नाटकाच्या अनुभूतीमध्यें एक वेगळी सामाजिकता असते; हजारों व्यक्तींचीं मनें एकाच अनुभूतीनें एकदम हलवली जाण्यांत एक वेगळी उत्कटता असते. हा अनुभव इतर कोणत्याहि वाङ्मय-प्रकारांत क्वचित्‌च आढळतो. राष्ट्राच्या वा एकाद्या भाषिक समाजाच्या पुनरुत्थानाच्या दृष्टीने याचें महत्त्व अनन्य आहे. यासाठी रंगभूमीच्या या व्यावहारिक अडचणी दूर होणें अत्यावश्यक आहे. साहित्यसंस्थांनी व सरकारने यांत लक्ष घालणें निकडीचें आहे हें तर खरेंच, परंतु श्री. पेंढारकरांनी सुचवल्याप्रमाणें नगर-पालिकांनीहि आपापलीं नगुनेदार नाटयगृहें उभारणें योग्य व अवश्य ठरेल.

या व्यावहारिक अडचणी चळवळीने व संघटनेने दूर होण्यासारख्या आहेत. व तशा त्या लवकरच होतील, अशीं प्रसादचिन्हें दिसतात. परंतु चळवळ व संघटना यांच्यापलीकडे कांही गोष्टी शिल्लक उरतात. व त्याच मूलभूत असतात. त्या म्हणजे अभिरुचिसंपन्न नाटय-निर्मिति आणि त्याहि पलीकडे खरे प्रतिभाशाली नाटक-कार, यांच्या अभावीं अद्ययावत् नाटयगृहें व सरकारी अनुधनें यांचा काय उपयोग? रसिक श्रोते, जाणते टीका-कार केवळ 'हें तें नव्हे' एवढेंच म्हणणार, व असमाधानाने व्यथित होऊन परतणार. आज तर अशी अवस्था आहे कीं ज्या नाटकांच्या प्रयोगांनी एकेकाळी रसिकांना वेड लावलें तीं नाटकेंहि आज अर्धवट, अधुऱ्या व विसंगति-पूर्ण प्रकाराने रंगभूमीवर ढकललीं जात आहेत, असा अनेकांचा अनुभव आहे. नाटयनिर्माते व नाटककार यांनी हें वेळींच लक्षांत घेतलें तर उद्यां निर्माण होणाऱ्या नाटयगृहांचें चीज तरी होईल.

विदर्भ साहित्य संघ, प्रकाशन नागपूर

[मध्यप्रदेश सरकारचे मुख्य मंत्री माननीय पंडित रविशंकर शुक्ल यांनी पुरस्कृत केलेलें आणि मराठी भाषा शिकूं इच्छिणाऱ्या हिंदी भाषीयांसाठी अत्यंत उपयुक्त असलेलें पुस्तक]

हिंदी मराठी–भाषा–प्रवेशिका

लेखिका : मालतीबाई श्रीखंडे, एम्. ए., बी. टी. किंमत : सव्वा रुपया

एकमेव विक्रेते : कर्मवीर बुकडेपो, महाल नागपूर २

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पाश्चात्य साहित्य आणि साहित्यकार

आल्बर्ट श्वाइट्झर

लेखिका—सौ. विमलाबाई देशपांडे

(आजच्या जगांत साधुत्वाचा आविष्कार अत्यल्प प्रमाणांत आढळून येतो. आल्बर्ट श्वाइट्झर याचें जीवन साधुत्वाचें दर्शन होय. त्याच्या जीवनाची स्थूल रूपरेखा पुढील लेखांत आलेखित करण्यांत आली आहे. श्वाइट्झरचें जीवन हाच एक चालता बोलता, स्फूर्तिदायी ग्रंथ आहे. गतवर्षी त्याला शांततेचें नोबेल पारितोषिक देण्यांत आलें. त्यानें बरेच ग्रंथ लिहिले आहेत. त्यांत त्याच्या आत्मचरित्राचे खंड, संस्कृतीचें स्वरूप, तिचा ऱ्हास, आणि पुन:प्रस्थापना या विषयींचे विचार, भारतीय तत्वज्ञान आणि त्यांचा विकास या विषयावरील अनेक ग्रंथ अंतर्भूत आहेत. त्यानें आफ्रिकेंत जाण्यांच्या अगोदरच ख्रिस्तावर संशोधनात्मक प्रबंध लिहून डॉक्टरेट मिळवली होती. बाखवरील त्याचा ग्रंथ प्रमाणभूत मानला जातो. गटेवर त्यानें लिहिलेला निबंध विद्वन्मान्य आहे. त्याचे हें सगळें साहित्य म्हणजे आजच्या युरोपियन संस्कृतीचा एक भाग आहे. आजच्या युरोपिअन संस्कृतीमध्यें जें चिरंतन आणि मंगलमय आहे त्यांत श्वाइट्झरचें जीवन आणि त्याचें साहित्य यांना फार मोठें स्थान आहे. – संपादक)

जर्मनीजवळ, अल्सॅस प्रांतांतील कोल्मर गांवांत मुख्य चौरस्त्याच्या मध्यभागीं एक पुतळा उभा करण्यांत आला होता. तो काळ पहिल्या महायुद्धापूर्वीचा होता. आफ्रिकेंत ज्या करड्या अंमलाखालीं जर्मन साम्राज्यशाहीनें काळ्या नीग्रो लोकांना गुलाम बनविलें होतें, त्या साम्राज्यशाहीच्या एका अधिकाऱ्याचें स्मृतिचिन्ह म्हणून तो पुतळा उभारला गेला होता. पुतळ्याच्या खालच्या बाजूस एका शृंखलाबद्ध नीग्रोची नग्न मूर्ति कोरलेली होती. या अतीव करुणपूर्ण मूर्तीकडे पाहतां पाहतां आल्बर्ट श्वाइट्झरच्या हृदयांत कालवाकालव सुरूं झाली. मानव मानवाला केवढ्या अमानुष रीतीनें वागवूं शकतो ह्याचें, ही नीग्रोची नग्न शृंखलाबद्ध मूर्ति ही, जगूं प्रतीकच आहे असें त्याला वाटलें. त्याच्या मनांत विचारांचें वादळ सुरूं झालें, "या काळ्या लोकांना आम्ही अत्यंत अमानुष रीतीनें वागवतों असं मी वाचलं होतं खरं. त्यांच्या व्याधींवर इलाज करण्यासाठीं त्यांना औषधें किंवा डॉक्टरहि आम्ही पुरवीत नाही ना !"

श्वाइट्झरच्या अंत:करणाला त्या नीग्रोच्या मूर्तीनें एक क्षणभरहि शांतता मिळूं दिली नाही. श्वाइट्झर आपल्या मनाशींच विचार करूं लागला, "या दृश्यानें मला एवढी टोंचणी कां लागावी ? मी कांही दु:खितांची व मागासलेल्यांची स्थिति सुधारणारा मिशनरी नाही. किती झालें तरी स्ट्रासबुर्ग विश्वविद्यालयांतील एक प्राध्यापक आहे. मला या दृश्यानें एवढें हादरून कां सोडावें ?"

प्राध्यापकाला टोंचणी लागली–

आल्बर्ट श्वाइट्झर हा केवळ एक प्राध्यापकच नव्हता. तेवढ्या ३० वर्षांच्या वयांतहि त्यानें तीन क्षेत्रांत कीर्ति मिळविली होती. बायबलचा तर तो त्रिभुवनख्यात पंडित होता. युरोपांतील व ब्रिटनमधील संगीतप्रेमी जनतेचा तो आवडता वादनपटु होता, आणि 'बाख' नामक सुप्रसिद्ध जर्मन संगीतज्ञाचें एक नामांकित चरित्र त्यानें जर्मनीला बहाल केलें होतें. गायन, वादन, तत्वज्ञान व अध्यापन या व्यवसायांत रंगलेल्या या प्राध्यापकाला त्या शृंखलाबद्ध नीग्रोच्या दुस्थितीनें इतकी टोंचणी लागण्याचें खरोखर कांही कारण तरी होतें कां ?

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

याच विकल मनस्थितींत असतां एके दिवशीं एका मासिकांत जर्मनीच्या आफ्रिकेंतील वसाहतीं संबंधी त्याच्या वाचण्यांत आलें कीं, "आम्ही मिशनरी लोक या आफ्रिकन लोकांना धर्माची शिकवण देण्याचा प्रयत्न करीत आहोंत खरे पण त्यांना होणाऱ्या निरनिराळया रोगांमुळें आमच्या डोळयांदेखत ते पटापट मरून जात आहेत. आतां या गोष्टींवर आम्हां मिशनऱ्यांना काय इलाज करतां येणार ?"

श्वाइट्झरची प्रतिज्ञा

या लेखाच्या रुपानें जणूं दैवच श्वाइट्झरला एका वेगळया जीवनाकडे खेंचून नेत होतें. तो लेख वाचल्यावर आपणांस काय वाटलें हें त्यानें पुढें एका ठिकाणीं लिहून ठेवलें आहे. तो लिहितो, 'आम्ही साऱ्या गोऱ्या राष्ट्रांनीं काळया राष्ट्रांवर जे अत्याचार केले आहेत; त्या अपराधांचें प्रचंड ओझें आज आम्हां सर्व गोऱ्या लोकांच्या माथ्यावर आहे. आम्ही जर त्यांच्याशीं चांगलें वर्तन केलें तर तो उपकार ठरणार नसून, तें आमच्या गत पापांचें प्राय:श्चित्तच ठरेल."

कोलमर गांवांतील चौरस्त्यावर त्या नीग्रोच्या नग्न मूर्तीनें जें कार्य सुरू केलें, त्याची परिणति या मासिकांतील लेखानें केली. आपलें, यापुढील सर्व आयुष्य त्या जंगली आफ्रिकन् लोकांसाठींच वेंचावयाचें अशी प्रतिज्ञा श्वाइट्झरनें करून टाकली.

पहिलें पाऊल टाकलें

ही प्रतिज्ञा कळतांच श्वाइट्झरच्या साऱ्या मित्रांनी त्याचें मन वळविण्याचा परोपरीनें प्रयत्न केला. ते म्हणूं लागले 'आफ्रिकन लोकांना साह्य केलें पाहिजे हें खरें, पण श्वाइट्झरसारख्या बुद्धिमान, विद्वान, वादनपटु प्राध्यापकानें आपलें काम सोडून आफ्रिकेसारख्या जंगलीं मुलुखांत आपलें आयुष्य काढावें हा कुठला वेडेपणा ? श्वाइट्झरनें त्या आफ्रिकन लोकांच्या मदतीसाठीं पैसा जरूर गोळा करून द्यावा पण रक्तपितीच्या रोग्यांना आपल्या हातांनी धुऊन पुसून काढण्यासाठीं कांही त्याचा जन्म झालेला नाही.

पण श्वाइट्झर आपल्या प्रतिज्ञेपासून ढळला नाही. त्यानें आपल्या मित्रांना शांतपणें उत्तर दिलें "प्रत्यक्ष कृतीनेंच कोणत्याहि संकल्पाला प्रारंभ केला पाहिजे" आणि प्रत्यक्ष कृतीच्या रोखानें त्यानें पहिलें पाऊल टाकलें. त्यानें मेडिकल कॉलेजमध्यें प्रवेश मिळविला. आफ्रिकेंतील, जंगली लोकांच्या आधिव्याधि नाहीशा करण्यासाठीं श्वाइट्झरला डॉक्टर होणें अवश्य वाटलें. तीस वर्षांच्या वयानंतर प्राध्यापक, पंडित व वादनपटु या नात्यानें कीर्ति मिळविल्यावर या ध्येयनिष्ठानें मेडिकल कॉलेजच्या-पहिल्या वर्षांत पदार्पण केलें. पांच वर्षांचा अभ्यासक्रम पुरा होण्याच्या सुमारास, रोगचिकित्सा व शस्त्रक्रिया या दोन्ही विषयांत नैपुण्य मिळवून बाहेर पडण्याच्या सुमारास, श्वाइट्झरच्या आयुष्यांत एक अनपेक्षित घटना घडली. या ध्येयनिष्ट पुरुषाचें, स्ट्रासबुर्ग विश्वविद्यालयांतील एका ज्यू इतिहासतज्ज्ञाच्या मुलीवर प्रेम जडलें.

ध्येयपूर्तीत व्यत्यय कीं साह्य ?

त्याच्या मित्रांना आशा वाटूं लागली. प्रेमपाशांत सांपडलेला हा ध्येयवेडा आतां तरी आपली अव्यवहार्य कल्पना टाकून देईल, अशी त्यांना खात्री वाटूं लागली. पण दैवाचा संकेत कांही वेगळाच होता गोऱ्या माणसांच्या हृदयांत कधीं कधीं गोरेपण असतें याची साक्ष जगाला पटायची होती. कोटयवधि गोरे लोक अमानुषपणें काळया लोकांना गुलामांसारखे वागवतात, पण त्यांतील एखादा दुसरा काळजीचा व हृदयाचाहि गोरा माणूस त्या काळया माणसांसाठीं, माणूस म्हणून आपलें आयुष्य वेंचावयाला तयार होतो, हें आशादायक दृष्य जगाला दिसावयाचें होतें.

श्वाइट्झरनें आपली प्रेयसी हेलेन ब्रेस्लॉ हिला सरळ मागणी घातली. "जंगली लोकांत जाऊन काम करण्यासाठीं म्हणून मी डॉक्टर होत आहे. त्या जंगलांत तूं आपलें सारें आयुष्य माझ्याबरोबर घालवायला तयार आहेस कां ?"

"मीहि नर्सचें शिक्षण घेणार आहे. मग माझ्याशिवाय तुम्ही कसे एकटे जाल, सांगा बरं ?" हेलननें उत्तर दिलें.

श्वाइट्झर डॉक्टर होऊन बाहेर पडला. पण आफ्रिकेच्या त्या जंगली मुलुखांत रोग्यांना बरें करण्यासाठीं जायचें तर नुसत्या डॉक्टरनें जाऊन भागणार नाही; औषधें, शस्त्रक्रियेचीं सर्व उपकरणें व दवाखान्याला लागणारी सर्व सामग्री बरोबर नेल्याशिवाय तेथें जाण्याचा कांही फायदा होणार नाही, हें श्वाइट्-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

झरला माहित होतें. ही सारी सामग्री आणण्यास पैसे लागणार! तेव्हां पैसे जमविण्यासाठीं त्याने व्याख्यानें दिलीं, लेख लिहिले, वादनाचे अनेक जलसे केले. कोणत्यातरी मार्गाने पैसे मिळविले व त्याच्या जोरावर वैद्यकीय सामग्री आणून आपण आफ्रिकेला जावें असें त्याने ठरविले.

आफ्रिकेच्या जंगलांत

अखेर १९१३ सालीं 'गुडफ्रायडे'च्या सुमुहूर्तावर श्वाइट्झर पतिपत्नि आफ्रिकन कांगोला जाण्यास निघालीं. जहाजांतील प्रवास संपवून व लहानशा होडींतून आफ्रिकन नदींतला प्रवास पार पडून अखेर लँबरेन गांवीं श्वाइट्झर सपत्नीक येऊन पोंचला. नाना व्याधींनी ग्रस्त झालेला असा तो प्रदेश होता. नाना रोगांना पसरविणाऱ्या कोटचवधि माशा, गोमाशा, उधळचा व डांस यांचें तें जगं आगरच होतें.

लँबरेन हें तेथील मिशनचें ठिकाण होतें व श्वाइट्झर येण्यापूर्वी त्याच्यासाठीं एक दोन खोल्या व दोन खोल्यांचें हॉस्पिटल एवढी व्यवस्था केली जाईल असें त्याला आश्वासनहि मिळालें होतें. पण श्वाइट्झर येऊन पाहतो तों एखादें मोडकळीस आलेलें घर देखील तेथें नव्हतें. बरोबर आणलेलीं भारी किंमतीचीं शस्त्रक्रियेचीं उपकरणें व औषधें हीं ठेवावीं तरी कोठें असा त्यांना प्रश्न पडला. या उष्ण व दमट प्रदेशांत त्या उपकरणांना गंज चढायला काय उशीर? आणि वाटल्यांतील औषधें उष्णतेनें जागच्या जागींच खराब होऊन जायचीं.

पण या विचारांना त्यांना वेळच नव्हता. त्यांनी लागलीच तेथें तंबू ठोकला, उपकरणें गंजूं नयेत म्हणून तीं तेल लावून ठेवलीं व झऱ्यांजवळील थंड भागांत औषधांच्या बाटल्या पुरून ठेवल्या, गोऱ्या माणसाच्या या चमत्कारीक हालचाली पाहून तेथील जंगली लोक साशंक झाले. तंबू भोंवतीं पेटलेल्या शेकोटीजवळ त्या कोलमरमधील पुतळचांतील नीग्रोसारखे लोक येऊन जमूं लागले. अरण्याच्या खोल घनदाट भागांतून मनुष्यभक्षक लोक आपले अणकुचीदार दांत दाखवीत पुढें सरसावूं लागले.

श्वाइट्झरच्या वाटाडचाला ही सारी साशंक जंगली लोकांची गर्दी भयसूचक वाटूं लागली. या जंगली टोळचांतील मांत्रिकांनी गोऱ्या लोकांविरुद्ध खूपच द्वेष पसरविला आहे तेव्हां या लोकांचें हें येणें मोठें धोक्याचें आहे असा इशारा त्याने श्वाइट्झरला दिला. श्वाइट्झर दुरून सगळचा लोकांना सूक्ष्मपणें न्याहाळीत होता. त्याच्या तज्ज्ञ दृष्टीला त्यांतील व्याधिग्रस्त लोकांच्या वेगवेगळचा व्याधि सहज कळून चुकल्या.

पहिली 'बोहनी'

" चला, कामाला लागूं या. त्या साऱ्या आजारी माणसांना जवळ घेऊन ये." डॉक्टरनें आपल्या वाटाडचाला आज्ञा केली. एक कोंबडचांचे खुराडे साफसूफ करून तेथें एक कँप कॉट टाकण्यांत आली. शस्त्रक्रिया करण्याची जागा अशा तऱ्हेनें तयार करण्यांत आली. ते जंगली लोक हळू हळू जवळ येऊं लागले पण त्यांच्या हातांत भाले व परजलेले सुरे चकाकत होते. विषदिग्ध बाण भात्यांत घालून कांहीं जण धनुष्ये घेऊन आले होते. या भयंकर प्रेक्षकांसमोर श्वाइट्झरच्या शस्त्रक्रिया नैपुण्याची परीक्षा व्हावयाची होती.

पोटदुखीच्या विकाराने आजारी असलेला एकजण रोगी शस्त्रक्रिया मंचकावर चढला. जंगली प्रेक्षकांच्या नजरांपासून आपली ही शस्त्रक्रिया दूर ठेवावी, म्हणून त्या पलंगाभोंवतीं श्वाइट्झरने एक पडदा लावला अ‍ॅपेंडिसायटिसचें ऑपरेशन सुरू झालें. तिकडे पडद्यांतील भोकांतून झाडांवर चढलेल्या लोकांचे संशयी डोळे लुकलुकत होते.

श्वाइट्झरच्या मनांत आलें या शस्त्रक्रियेंत हा रोगी दगावला तर? हे त्याचे जातभाई मला फाडून खातील. पण त्याचा हात चालू होता. ऑपरेशन संपलें. रोग्याने डोळे उघडले. तें पाहतांक्षणींच त्या जंगली लोकांमध्ये एकदम विश्वास निर्माण झाला. आपल्या डोळचांदेखत, या गोऱ्या मांत्रिकानें आपल्या जातिबांधवाला सुरीनें मारले आणि थोडचा वेळांत त्याने या मृत माणसाला जिवंतहि केलें! या गोऱ्या मांत्रिकाची विद्या अजब आहे!– जंगली लोकांनी एकमतानें निर्णय दिला!

हॉस्पिटलची स्थापना

या गोऱ्या मांत्रिकावर एकदां त्या जंगली लोकांची श्रद्धा बसतांच, हॉस्पिटल बांधण्याच्या कामीं

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्वाइट्झरला त्रास पडला नाही, लोकांनी स्वयंस्फूर्तीने एक तीन खोल्यांचें हॉस्पिटल एका टेकडीवर बांधून दिलें. कारण खालीच पुरानें दुथडी वाहणारी नदी खळाळत होती – श्वाइट्झरची कीर्ति त्या जंगली मुलुखांत हां हां म्हणतां पसरली. दूरदूरच्या ठिकाणाहून रोगी ऑपरेशन करून घेण्यासाठीं येऊं लागले. नाना तऱ्हेच्या शस्त्रक्रिया एकामागून एक श्वाइट्झरने चालविल्या. त्याच्या सुदैवाने पहिल्या सबंध वर्षांत एकहि रोगी दगावला नाही.

कधी कधीं मोठमोठीं गळवें झालेले रोगी महिनोगणति हॉस्पिटलजवळ पडून राहत. कारण ही गळवें बरीं होण्यास बराच काळ लागे. त्या रोग्यांना खाण्यापिण्यासाठीं त्यांचे नातलग मांस, फळें वगैरे आणून देत. पण काहींना तर श्वाइट्झरला आपल्याजवळचेंच अन्न द्यावें लागे. यासाठीं त्याने कांही जागा साफ करून तेथें फळें व भाज्या लावल्या. तरी एवढ्यावर त्याचा स्वतःचा व इतरांचा नेहमीचा उदरनिर्वाह भागणें शक्य नव्हतें. म्हणून त्याला युरोपांतून धान्य, मांस, लोणी, बटाटे इत्यादि पदार्थ जास्त किंमत देऊन नेहमीं आणावे लागत.

हॉस्पिटलचा जम बसतांच, दूरदूरच्या जंगली टोळ्यांकडे जाऊन श्वाइट्झरने रोगी तपासण्यास सुरुवात केली.

त्याचें आरामस्थान

कामाच्या या प्रचंड ओझ्याखालीं श्वाइट्झर केव्हांच वाकून गेला असता. पण त्याच्यापाशी एक संजीवनी होती. दिवसभराचें आपलें कष्टदायक काम आटोपून रात्रीं तो आपल्या पियानोपाशीं वाजविण्यास बसला कीं, दिवसभराचे कष्ट वादनाच्या पहिल्याच सुराबरोबर कोठच्याकोठें नाहींसे होऊन जात. उष्ण प्रदेशांत टिकावा यासाठीं मुद्दाम विशेष काळजी घेऊन तयार करण्यांत आलेला तो पियानो श्वाइट्झरला पॅरिसच्या संगीत मंडळाने भेट म्हणून दिला होता. जंगली श्वापदांच्या दूरदूरच्या गर्जनांची पार्श्वभूमि विसरून, त्या पियानोवर बसून श्वाइट्झर जेव्हां नादब्रम्हांत विलीन होई, त्यावेळीं त्या आफ्रिकेच्या जंगलांतून त्याचें मन निघून एका उच्च आनंदमय वातावरणांत विहरूं लागे. पण कधीं कधीं त्याच्या खांद्याला हळूंच स्पर्श करून त्याची पत्नी हेलन त्याला खिडकींतून दिसणारें भयानक दृश्य दाखवी. हॉस्पिटलमधील असहाय रोग्यांपैकी एकाला हळूंच पळवून त्यांची आपली मेजवानीची तयारी करण्यासाठीं झेंडा नांवाचे नरभक्षक लोक हळू हळू पुढें सरकतांना श्वाइट्झरला दिसत. लागलीच पियानोला रजा देऊन तो आपली बंदूक उचली व हवेंत एकदोन वायबार काढी. त्या आवाजाने ते जंगली नरभक्षक लोक भराभर पळून जात. श्वाइट्झरचें काम केवळ डॉक्टरचें नव्हतें, रक्षकाचेंहि होतें.

स्थानबद्ध

अशा तऱ्हेच्या कार्यांत जवळजवळ सव्वावर्ष गेल्यावर ऑगस्ट १९१४ मध्यें पहिलें महायुद्ध सुरूं झालें. लागलीच आफ्रिकेंतील फ्रेंच अधिकाऱ्यांनी येऊन हॉस्पिटलला गराडा घातला. "तुम्ही जर्मन असल्यामुळें तुम्हाला पकडण्यासाठी आम्ही आलों आहोंत"—त्यांनी सरळ सांगितलें.

"पण आम्ही अल्साशियन आहोंत. जर्मन नव्हे. आणि जर्मनांच्या येथील छळणुकीचेंच क्षालन करण्यासाठीं येथे येऊन राहिलों आहोंत.' श्वाइट्झरने निराशपणें उत्तर दिलें. पण सैन्याधिकाऱ्यांना हे नाजुक भेद कोठून समजणार ? त्यांनी पतिपत्नीला लागलीच कैद करून युरोपांत पाठवून दिलें. युद्ध संपेपर्यंत ते एका स्थानबद्धांच्या शिबिरांत ठेवले गेले होते. युद्ध संपतांच त्यांना मुक्त करण्यांत आलें. पण दोघेहि अतिशय आजारी झाले होते. आफ्रिकेला परत कधींहि न जाण्याबद्दल डॉक्टरांनीं त्यांना बजावलें होतें.

पुन्हा श्री गणेशापासून

तीन वर्षांनी श्वाइट्झरची प्रकृति सुधारली. लागलीच त्यानें आपलें कार्य पुन्हा सुरूं करण्यासाठीं पैशाची जुळवाजुळव करण्यास प्रारंभ केला. पुन्हा व्याख्यानें देऊन, आपल्या वादनाचे युरोपभर एक सारखे जलसे करून व आपल्या राहणींत शक्य तेवढी काटकसर करून दोन तीन वर्षांत श्वाइट्झरनें पुरेसे पैसे जमविले व १९२४ सालीं तो परत आफ्रिकेंत जाण्यास निघाला. हेलन अजूनहि आजारी असल्यामुळें ती त्याच्या बरोबर जाऊं शकली नाही.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लँबरेनला परत आल्यावर श्वाइट्झर पाहतो तों, अतिशय उष्णतेमुळें, उधयांच्या भयंकर उपद्रवामुळें सारें हॉस्पिटल सर्व उपकरणांसह नामशेष झालें होतें. त्याला पुन्हा श्रीगणेशापासून सारें सुरूं करावें लागलें. सकाळीं डॉक्टरच्या नात्यानें तो रोग्यांना औषधें देई व दुपारीं हॉस्पिटल बांधण्याचें काम करी. त्या जंगली लोकांनी पुन्हा त्याला मदत देऊन हॉस्पिटल उभारून दिलें. व जवळच्या एका कॅथॉलिक मिशनऱ्यानें या प्रॉटेस्टंट डॉक्टराच्या हॉस्पिटलसाठीं एक कुशल सुतार पाठविला. या जंगली प्रदेशांत हेलन बरोबर नसल्यामुळें भासणारी एकटेपणाची तीव्र जाणीव आपल्या कामाच्या पसाऱ्यांत श्वाइट्झरनें बुडवून टाकली.

'जास्त औषधें पाठवा. जास्त जास्त अन्न पाठवा' ही त्याची युरोपियन लोकांना सतत मागणी होती. "आतां येथें खूपच सुधारणा झाली आहे. मृत्यूसंख्या पुष्कळच घटली आहे. रक्तपिती खूपच कमी झाली आहे. फक्त जवळ जवळ ५०,००० लोकच रक्तपितीनें पीडित झालेले आहेत." अशा तऱ्हेची त्या भयंकर जंगलांतील व्याधिमुक्ततेची माहिती तो युरोपकडे पाठवीत होता. ५०,००० रक्तपितीचे रोगी राहिले म्हणजे फारच सुधारणा झाली असें समजावें; ही श्वाइट्झरनें दिलेली माहिती आफ्रिकेंतील रोगग्रस्ततेवर केवढा विदारक प्रकाश टाकते ! आणि या विशाल घनदाट जंगलांत लक्षावधि जंगली काळया लोकांची यथाशील रोगमुक्तता करावी या निग्रहानें एक डॉक्टर आल्बर्ट श्वाइट्झर काय तो जिवाचें रान करीत होता !!

कार्याचा भाग्योदय

कांहीं वर्षांनी बरी होऊन हेलन परत कामावर आली. पतिपत्नीच्या कार्याचा भाग्योदय झाला. युरोपीय लोकांच्या मदतीमुळें व तद्देशीय लोकांच्या श्रमामुळें ३०० रोगी राहतील एवढें एक हॉस्पिटल तेथें बांधलें गेलें. शस्त्रक्रियेसाठीं सुसज्ज खोली, प्रसूतिगृह, दवाखाना इत्यादि सर्व वैद्यकीय साधनसामग्रीनें युक्त असें तें हॉस्पिटल बनलें. विजेनें चालणाऱ्या यंत्राचीहि तेथें योजना होती, जास्त–जास्त रोग्यांची सोय होत होती. काळया जंगली लोकांवर गोऱ्या साम्राज्यशाहीनें केलेल्या अत्याचारांचें जास्तींत जास्त पाप प्रक्षालन श्वाइट्झरच्या निग्रहामुळें, चिकाटीमुळें व आत्यंतिक ध्येयनिष्ठेमुळें होत होतें.

पापक्षालनाला अमेरिकेचें साह्य

इतक्यांत १९३९ सालीं युरोपांत दुसरें महायुद्ध सुरूं झालें. यावेळीं मात्र त्यांच्या व आफ्रिकन लोकांच्या सुदैवानें लष्करी अधिकाऱ्यांनी श्वाइट्झर जर्मन म्हणून त्याला अटक केली नाही, उलट त्याच्या त्या अतीव मानवी कार्याला महायुद्धाच्या धामधुमींतहि लष्करी अधिकाऱ्यांनी व अमेरिकेंतील ख्रिश्चन व धर्मोपदेशकांनी सतत आर्थिक व इतर सहाय्य चालूंच ठेविलें. अमेरिकेंतील वादनपटु लोकांनी जलसे करून श्वाइट्झरकडे पैशांचा ओघ चालू ठेवला, ख्रिश्चन धर्मोपदेशकांनी सामग्रीनें भरलेलीं जहाजें आफ्रिकेकडे पाठविण्याची व्यवस्था केली. आणि आश्चर्य हें कीं यांतील एकहि जहाज समुद्रानें गिळलें नाहीं. श्वाइट्झरच्या रूपानें गोऱ्या राष्ट्रांनीं सुरूं केलेल्या पापप्रक्षालनाच्या कार्यात युद्धकाळांतील त्या सर्वभक्षी सागरालाहि अडथळा आणावासा वाटला नाही !

आणि या सर्वांचा परिणाम म्हणजे आज लँबरेन येथें श्वाइट्झरचें हॉस्पिटल जास्त जास्त वाढत चाललें आहे व अधिकाधिक काळया लोकांची रोगापासून मुक्तता होते आहे.

मानवतेचें मांगल्य

आज १९४६ सालांत श्वाइट्झर पतिपत्नि गेल्या २५ वर्षांच्या आंत्यंतिक परिश्रमांमुळे अतिशय थकलीं आहेत. विश्रांतीसाठी अमेरिकेंत कांहीं काळ तरी या, अशीं श्वाइट्झरच्या मित्रांची व हितचिंतकांचीं पत्रांवर पत्रें येत आहेत, पण श्वाइट्झरचें एकच उत्तर– 'अजून कितीतरी काम करावयाचें पडलें आहे. विश्रांतीला फुरसद तरी कुठें आहे ? मी आज ७० वर्षांचा आहे. त्याऐवजीं ३० वर्षांचाच असतों, तर किती बरें झालें असतें असें मला वारंवार वाटतें. पण माझ्या या वयांतहि माझी प्रकृती अजून सुदृढ आहे यावद्दल देवाला मला मनापासून धन्यवाद द्यावेसे वाटतात.'

या विलक्षण परिश्रमांच्या काळांतहि श्वाइट्झरने तत्वज्ञानावरचे दोन ग्रंथ लिहून पुरे केले व तिसराहि

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुरा करण्याची त्याची महत्वाकांक्षा आहे. श्वाइट्झर पंडित असला तरी त्याचें तत्व साधें व अतीव मानवी आहे. तो आपल्या ग्रंथांत लिहितो, "मानवाचें व्यक्तित्व ही सर्व धर्मांच्या, वर्गांच्या व वंशांच्या पलीकडे असलेली अत्यंत पवित्र, मंगल अशी वस्तू आहे. मानवतेच्या या मूल्याचा जर एकदां त्याग केला तर बुद्धिमान माणसाचा सर्वनाश होईल, आणि बुद्धिमंतांनींच मानवतेचें मूल्य क:पदार्थ मानलें, तर संस्कृतीचा व अखिल मानवतेचाच सर्वनाश वाढून ठेवला आहे हें नि:शंक समजावें."

श्वाइट्झरच्या जीवनाचा ध्रुवतारा म्हणजे येशू-ख्रिस्ताचा अखिल मानव जातीवर प्रेम करण्याचा संदेश होय. "या प्रेमामुळेंच आपल्याला ईश्वराशीं एकरूप होतां येईल." अशी श्वाइट्झरची आत्यंतिक श्रद्धा आहे.

धर्मवेडा नव्हे, मानववेडा

आजवर मानवी इतिहासांत या मानवप्रेमाने स्फूर्त होऊन जे जे ध्येयनिष्ठ लोक सुखाचा व संपत्तीचा त्याग करून आपल्या दलित बांधवांची सेवा करण्यासाठीं खपले, त्या अतीव मानवी ध्येयनिष्ठांच्या रांगेंत आल्बर्ट श्वाइट्झरचा समावेश आहेच. पण श्वाइट्झरची ध्येयनिष्ठा धार्मिक नाही. मानवी आहे. हें त्याचें वैशिष्टच आहे. आज उभ्या जगांत साम्राज्यवादाच्या वा साम्यवादाच्या नावानें सत्ताधारी मानवांनी आपल्या दलित बांधवांचा ठिकठिकाणीं अमानुष छळ चालविला आहे. कुठलातरी 'इसम' कुठलातरी वाद, कुठल्यातरी अचाट कार्यक्षमतेच्या व जगद्विजयाच्या कल्पना घेऊन बसल्यामुळें आज मनुष्य मनुष्यत्वाला पारखा झाला आहे. या मानवताशून्य व नानावादपूर्ण जागतिक पार्श्वभूमिवर, सर्व वर्णधर्म – वंशांतील अशा मानवतेचें जें पावित्र्य, जें मांगल्य श्वाइट्झरनें आपल्या उभ्या आयुष्याच्या प्रत्यक्ष उदाहरणाने जगाला दाखवून दिलें, त्यामुळें गोऱ्या साम्राज्यवाद्यांच्या पापांचें तर अंशत: क्षालन होतच आहे. पण याशिवाय सत्ताधारी, विजयोन्मत्त अशा गोऱ्या राष्ट्रांमध्यें कांही व्यक्तींच्या हृदयांत अतीव मानवता वसत आहे ही साक्ष पटल्यामुळें मानवतेचें भवितव्य आश्वासनपर वाटूं लागलें आहे. गोऱ्या राष्ट्रांत श्वाइट्झरची मानवी परंपरा कधीतरी दृढमूल होईल काय ?

'युगवाणी' जुलै १९५४

कै. भा. रा. लोवलेकर (व्यक्ति आणि वाङ्मय)	—शरच्चंद्र मुक्तिबोध
कै. भा. रा. लोवलेकर (कांही संस्मरणें)	—प्रभाकर माचवे
कवितेचा जन्म	—वा. रा. कांत
पाश्चात्य साहित्य आणि साहित्यकार : ३	—गो. रा. दोडके
दिग्दर्शक व सादरकर्ते	—वा. वा. भोळे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

क वि ता

सरेल ही रात

खाट टाकून बसावें अंगणीं,
असावा वारा ऐकत बोलणीं,

असावें टिपूर चांदणें शुभ्र
रेंगाळणारें एखादें अभ्र,

तुझ्या आवडत्या मोगऱ्याचा वास
संथ पावलांनी फिरे आसपास

कामधाम सारें संपवून तुवां
बसतां जवळ, मधुर थकवा

आकाशींच्या तारा मोजतां मोजतां,
तुझीया कथा ऐकत पेंगतां–

म्हणावें तुवां 'चला ना घरांत–
अशानें इथेंच सरेल ही रात'

– म. म. देशपांडे

मन बधीर जाहलें
शुद्ध बुद्ध हरपली
तुझी ओष्ठ महिरप
फक्त नयनीं उरली

नाही मदिरेचा कैफ
मला सारें तें कळतें
नाही अमृत तहान
तेंहि मला आकळतें

इंद्र–शचि ओठांतील
प्राणहारी हालाहल
चुंबनांत दाह भारी
चुंबकाचे फार हाल!

परि, मला ऊर्वशीच्या
जीवदाही चुंबनाची
ओढ; विरे कशाने ना
ज्योति–आस पतंगाची!!

– शिरीष

ओढ

प्राजक्ताच्या देठासम
पोवळ्याच्या कांतींतला
भुंगा अधरीं चोरून
अलगद, गे, लपला

तुला नाही कळायची
ओढ माझ्या अधरांची
तुला नाही कळायची
धुंदी पदरा खालची!

सुखद व्हावया आगामी क्षण

निरोप देउनि आलो तुजला
कांहितरी पण विसरुनि गेलो
घुमूं लागला विरह–पारवा
–हृदयपंजरीं; खिन्न जाहलों.

ओढ घराची सवें घेउनी–
गेलिस तूं; मज नुरलें कारण–
–जवळ कराया घरकुल अपुलें
सुनें अतां जें तव हास्याविण

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पश्चिम क्षितिजावरली लाली
खुलतां अवचित तव हास्यांतुन
विरती माझे कष्ट दिसाचे
शिणल्या वेहीं, मन उल्हासुन

डोळ्यामधलें गुलाबपाणी
अधरावरचें अत्तर मादक
हातीं घेउनि तुझा मृदुल कर
मस्त सेवितो गुच्छ विमोहक

मधुर तुझ्या सहवासाचे क्षण
टिपून विकसित झालें जीवन
कलाकुसर अन् रंग मनोहर
तुझीच किमया गमे सचेतन

नीरव सुषमा अतां नकोशी
काळोखांतच जावें विसरुन–
विरहामधलें दुवळें काहुर
सुखद व्हावया आगामी क्षण

-- गणेश पाठक

अर्धीच ठेविली कविता

अर्धीच ठेविली कविता
मीं मनांत धरुनी हेतू
करशील पूर्ण गुंफुनिया
रेशमी भावना–तंतू !

अर्धीच ठेविली प्रतिमा
मीं धरुनी हेतु मनांत
हृदयस्थ प्रीतिरंगांनी
ओतशील जीवन त्यांत !

अर्धीच गायिला राग
मीं क्षणांत धरलें मौन
सुस्वरांत तूं उरलेला
करशील अंतरा पूर्ण !

अर्धीच बोललों भाषा
मीं हेतु मनीं इतकाच
उरलेलें हितगुज माझें
अडखळत वदावें तूंच !

अर्धेंच उघडिलें दार
मीं मनांत धरुनी हेतू
उघडून स्वतः तूं पुरतें
यावेंस न धरिता कितू !

– वसंत वऱ्हाडपांडे

टीपकागद

शब्द हवे, शब्द हवे
हा जीवन-ध्यास मला
सुम-पराग सेवाया
भृंगच जणु आसुसला...

शब्दांतुन साऱ्या त्या
उमटावें गीत मधुर
या माझ्या हृदयींच्या
विमल कमलपत्रावर,
प्राशित अन् भावगंध
धुंद प्रौढ त्यांमधला
कंठावें आयू हें
एकच ही आस मला...

ऋजुतेनें भरलेलें
अंतर मम नित्य असे
म्हणुनी मज शब्दांचें
न्यून न गुळि कधि भासे.
मूल जसें इवलेसें
अभिनव जें जें बघतें
आस्थेनें त्यां अपुल्या
कोषामधि साठवतें,
आढळतां शब्द तसा
कोठेही कसलाही
जपुनी मी ठेवि तया
मनिच्या मम भांडारीं...

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणि जई भरतें हें
पुरतें मन-भांडार
हळुच तई उत्सुक मी
उघडि तयाचें द्वार.
वाटे, मधु गीत अता
अर्थानें मोहरलें
रसधारांनी भिजलें
पाहतील हे डोळे;
परि न दिसे गीत तियें
धडपडतों ज्यासाठीं
स्वप्नें अन् ज्याचीं नित
बघतों मी दिनरातीं;
मात्र दिसे शब्दांची
कळाहीनशी वाकळ !
संगतिची इतुकीही
नसते त्यामधि दर्वळ !!

जाणवते तीव्र तदा
माझ्यांतिल उणीव मला–
मन्मनास नच ठावी
रचनेची दिव्य कला !

–वसन्त निनावे

साक्षात्कार

[छन्द - देवीवर]

काल अचानक कशी
जीभ माझी चावली ग
माझी माउली वत्सल
सोसते दुःखाची धग !

जीभ चावली म्हणून
झाली तुझी आठवण,
–स्मरणानें माझ्या होई
कष्टी रोज तुझें मन !

जीभ चावली म्हणून
घांस अडला घशांत
–रोज असेल अडत
घांस तुझ्या ग करांत !

जीभ चावली म्हणून
येई वेदनेला पूर
–वेदनांच्या भारें रोज
तुझें अस्वस्थ तें ऊर !

जीभ चावली म्हणून
तुझी जाणवे दूरता
–दूरताही दूर तुला
मनीं तुझ्या कातरता !

जीभ चावली म्हणून
गोठे माझ्या मुखीं रक्त
–परी तुझें रक्त गोठे
माझ्या काळजीनें फक्त !

जीभ चावली म्हणून
लागे कांटा माझ्या मनीं
–झाला साक्षात्कार तंव–
दुःख-कल्पना येऊनी

–माझा परमात्मा तूं ग
नि मी तुझा असे आत्मा
आतां काळजी नको ग
तुझा खुशाल जीवात्मा !

-- निशिकान्त कारकरे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नट आणि नटी

★ ★ ★ लेखक : वा. वा. भोळे ★ ★ ★

मराठी नाट्याला, त्याच्या उत्कर्षाच्या स्थिती-पर्यंत, माझ्या मतें, ज्यांनी नेऊन पोहोचवलं अशा नाटककारांच्या विषयीं माझे विचार, गेल्या खेपेस मी थोडक्यांत सांगितले होते. नाट्याचा आविष्कार नटांच्या कामगिरीनं होत असतो. अगोदर नट आणि नंतर त्याच्याकरतां नाटककार निर्माण होतो. याचा अर्थ असा नाही की, नटांच्या कलागुणाला वाव देण्याकरतांच केवळ नाटक लिहिलं जातं. प्रतिभावान् नाटककार, स्वतःला जें सांगायचं असतं त्याच्याकरतांच नाटक लिहितात. पण, नाटक लिहितांना नटांच्या अभिनय-सामर्थ्याकडे त्याला लक्ष द्यावंच लागतं. कारण, नट, नाटककार आणि दिग्दर्शक यांच्या परस्पर सहकार्यानंच कोणतीहि नाट्यकृती, उत्तम रीतीनं आविष्कृत होत असते. कित्येक वर्षांपूर्वी William Rostand या फ्रेंच नाटककाराकडे कॉकेलिन नांवाचा एक प्रख्यात नट गेला आणि म्हणाला की, "माझ्यांत संभाषण चातुर्य आहे, द्वंद्व चांगलं खेळूं शकतों, मला प्रेमपत्र चांगलीं लिहितां येतात. या माझ्या गुणांना वाव मिळेल अशी एक भूमिका तुम्ही लिहा." त्याच्या इच्छे-प्रमाणं Rostand यानं एक पात्र निर्माण केलं: पण त्या पात्राचं नाक मात्र अजस्त्र आहे असं दाखवलं; इतकंच नव्हे तर अशा नाकाच्या जाणिवेमुळं आपण कुरूप आहोत असा न्यूनगंड निर्माण झाल्याचं दाखवून, अशा कुरूप व्यक्तीचं जीवन मात्र अत्यंत धीरोदात्त आणि कारुण्यपूर्ण असं रंगवलं आहे. आपले गुण दाखवण्यास कॉकेलिन यास पूर्ण वाव मिळूनहि, प्रेक्ष-कांच्या मनावर अखेरचा ठसा उमटतो तो मात्र हा कारुण्यपूर्ण उदात्ततेचा. अर्थात् हा ठसा उमटवण्याकरतां कॉकेलिनचं अभिनयकौशल्यच लेखकाला उपयोगी पडलं हें निराळं सांगायला नको. या नाटकाचं नांव Syrano de Bergerac असं आहे. फ्रान्समधील वार्षिक नाट्यमोसमास याच नाट्यप्रयोगानं सुरुवात केली जाते आणि ही प्रथा कित्येक वर्षे चालू होती. सारांश, नट आणि नाटककार यांचा परस्परसंबंध असा आहे.

शाहू नगरवासीच्या रंगभूमीवर अयशस्वी म्हणून ठरलेलं खाडीलकरांचं 'कांचनगडची मोहना' हें नाटक महाराष्ट्र मंडळीच्या नटांनी यशस्वी करून दाखवलं; ही गोष्ट फारशी जुनी नाही. महाराष्ट्र व गंधर्व मंडळी यांतील नटवर्गाच्या सामर्थ्यामुळंच खाडीलकर आपल्या राजकीय तत्वज्ञानाचा प्रसार करूं शकले. तेव्हां १९०३/०४ पासून ज्या नटांचं कौशल्य मी प्रत्यक्ष पाहिलं, अशांच्या आणि त्यापूर्वी ज्यांनी रंगभूमि गाजवली असं सांगण्यांत येतं, त्यांच्याहि कौश-ल्याचा आज मी थोडक्यांत विचार करणार आहे. किर्लोस्कर हे नुसते नाटककारच नव्हते; ते नटही होते. स्वतःकडे एखादी सामान्य भूमिका घेऊनहि ते ती उठावदार करून दाखवीत, असा त्यांचा लौकिक होता. १८८० ते १९०२ पर्यंत जे नट रंगभूमीवर आले त्यांत भाऊराव कोल्हटकर, गणपतराव जोशी, आणि जनुभाऊ निमकर यांनीच विशेष कीर्ति मिळवली. भाऊराव उर्फ भावड्या यांची शरीरयष्टि स्त्रीपार्टास अगदीं योग्य.त्यांची आवाजी असामान्य आणि पल्लेदार; गायन—अत्यंत रस-परिपोषक; किर्लोस्करांचीं सर्वच नाटकं संगीतप्रधान; भाऊराव, मोरोबा वाघोलीकर, बाळकोबा नाटेकर वगैरे त्यांच्या सर्वच नटांची गायकी उत्तम. इतकं असूनहि

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संगीत हें साध्य नव्हे– तर रसोत्पत्तीचं तें एक प्रभावी साधन आहे, या जाणीवेनंच हे सर्व नट रंगभूमीवर गात, असं एकमतानं सांगण्यांत येतं. सौभद्रांतील पहिल्या अंकांत आपल्या अभिनययुक्त गायकीनं करुण रस निर्माण करावा भाऊरावांनीच, असं आतांहि म्हटलं जातं. हॅम्लेटच्या भूमिकेमुळं अमर कीर्ति मिळविणाऱ्या गणपतराव जोशांचे मुख्य गुण म्हणजे त्यांची खणखणीत पण स्वच्छ वाणी, रसानुकूल शद्बांच्यावर नेमका आघात देण्याची हातोटी; अत्यंत स्वाभाविक उच्चारपद्धति, स्वरांचं परिणामकारक आंदोलन आणि गद्यांतहि एक प्रकारची लय ठेवावी लागते याची स्वाभाविक जाणीव. त्यांचे बरोबर काम करणारे बळवंतराव जोग हेहि एक चांगले नट होते. दोघेहि प्रेक्षकांचे फार आवडते–इतके की, त्यावेळीं " गणू आणि बाळू " या लाडक्या नावानं ही जोडी ओळखली जाई.

जनुभाऊ निमकर हे 'तरुणी शिक्षण नाटिका' या नाटकांतील त्यांच्या चिमणीच्या भूमिकेमुळं एकदम प्रसिद्धीला आले.– पुढे त्यांनी स्वदेश हितचिंतक ही स्वतःची कंपनी काढली. आणि जनुभाऊंच्या नाट्यसामर्थ्यामुळंच ही कंपनी किर्लोस्करांच्या तोडीची ठरली. आणि तेहि भाऊरावासारखे गायक नट संग्रही नसतांना. जनुभाऊंनी केलेली चंद्रसेनेंतील रामाची, रामराज्यवियोगांतील दशरथांची आणि कुंजविहारींतील नारदाची– या सर्व भूमिका मी स्वतः पाहिल्या होत्या. शरीरसौंदर्य आणि गायकी या बाबतींत भाऊरावांच्या रांगेंत बसण्याची त्यांची योग्यता नव्हती. पण स्वतःचे चार सहा आणे किंमतीचे नाट्यगुण, पहाणारास रुपया किंमतीचे वाटावेत अशा दर्जाचं मांडणीचं प्रभावी कौशल्य जनुभाऊ इतकं दुसऱ्या एकाही नटांत मी तरी आजपर्यंत पाहिलं नाही. त्यांच्या कंपनींतील राजाराम सोहनी, अण्णा निमकर, केशवराव भोसले, दत्तोपंत भोसले, वल्लरी–जान्हवीचें काम करणारे नारायण आणि छोटा केशव इत्यादि नटांनी केलेला शारदेचा प्रयोग १९०३–०४ चे सुमारास जेव्हां मी पाहिला तेव्हां थक्क होऊन गेलों. शारदेचा इतका गहिरा प्रयोग दुसऱ्या कोणत्याहि–किर्लोस्कर कंपनीचाहि होत नसे. सामाजिक नाटकांचे जनक म्हणून देवलांना प्रतिष्ठा मिळाली ती जनुभाऊंच्या या नटवर्गामुळेच. हास्य,वीर, करुण वगैरे निरनिराळ्या रसांच्या भूमिका यशस्वी रीतीनं करणारे राजाराम सोहोनी आणि शारदा नाटकाला चिरकालीन कीर्ति मिळवून देणारे केशवराव भोसले यांच्या अभिनयाचें कौतुक करण्यायोग्य आपल्याजवळ शद्बच नाहीत असं मला त्यावेळीं वाटलं–पुढे केशवरावांनी स्वतःची कंपनी काढली तेव्हां त्यांतच सुभद्रेचं काम पाहिलं–त्यांच्या गायनवैशिष्ट्यानं मी थक्क झालों खरा, पण अभिनयाच्या दृष्टीनं माझी निराशा झाली. स्वभावाने ते महत्वाकांक्षी होते; म्हणूनच अभिनयाकडेही त्यांनी लवकरच लक्ष पुरवलं. वरेरकरांच्या नाटकांतील डॉ. गुलाब आणि डेव्हिड या त्यांच्या भूमिका अभिनयदृष्ट्या उत्कृष्ट ठरल्या. भावनेचा अवश्य तेवढा पण संयमित आविष्कार आणि बुद्धीची चमक हीं त्यांच्या अभिनयाचीं माझ्या मतें वैशिष्ट्यें म्हणून सांगता येतील. आपल्या गायनवैशिष्ट्यानं त्यांनी मराठी रंगभूमि कांही काळ चांगलीच गाजवली. आणि चिरकाल टिकणारी कीर्ति मिळविली, यांत शंकाच नाही. स्वच्छ आणि झारदार वाणीमुळं कृष्णराव गोरे प्रसिद्धीस आले. 'माईसाहेब' नाटकांतील अमृतराव मामाच्या भूमिकेमुळं गाजलेले नानवा गोखले हे नट सोडले तर गोऱ्यांच्यासारखा वाणीचा प्रभाव इतरत्र पाहण्यास क्वचितच मिळतो. गोरे यांचं 'विद्याहरण' नाटकांतील शुक्राचार्यांचं काम इतकं वाखाणण्यासारखं होई कीं त्यांच्यासारखा दुसरा शुक्राचार्य पुन्हा रंगभूमीवर दिसला नाही, असंच म्हणतां येईल. गोरे, राजाराम सोहोनी, विष्णूपंत पागनीस, जनुभाऊ निमकर इत्यादि नटांनी केलेला 'कुंजविहारी' नाटकाचा प्रयोग मी पाहिला. प्रेक्षकांना अक्षरशः वेड लावणारा हा प्रयोग होई. इतका उठावदार असा दुसऱ्या एकाहि नाटकाचा प्रयोग माझ्या तरी पाहण्यांत नाही.

१९०८ चे सुमारास मी किर्लोस्करांचीं मूकनायक आणि सौभद्र हीं नाटकं प्रथम पाहिलीं. अभिनयदृष्ट्या फक्त बोडसांचं प्रतोदाचं काम नितांतसुंदर असं वाटलं. नट म्हणून बोडसांची कीर्ति प्रतोदाच्या कामामुळंच प्रस्थापित झाली असं माझं मत आहे. स्वच्छ वाणी, स्वाभाविक भाषणपद्धती, शारीरिक हालचालींतील सहजता हींच बोडसांचीं अभिनयवैशिष्ट्यें आहेत. बालगंधर्व आणि जोगळेकर या सारखे प्रेक्षकांचे आवडते गायक त्यांच्याबरोबर रंगभूमीवर काम करीत असतांना आपल्याकडे प्रेक्षकांचं लक्ष खेचून

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

घेण्याचं कठीण काम बोडसांनी केलं, हें विशेष. अंगी अभिनयकला असेल तर प्रोज काम करणारा नट संगीत नटावरहि मात करूं शकतो ही गोष्ट माझ्या मतें बोडसांनींच प्रथम सिद्ध केली. मात्र फाल्गुनरावाच्या भूमिकेंत, गणपतराव भागवत, हे संशयग्रस्त झालेल्या माणसाचा आविर्भाव शेवटपर्यंत टिकवून प्रेक्षकांमधें हंशा पिकवीत, तर आपण एक विनोदी भूमिका करीत आहोत अशाप्रकारची जाणीव बोडसांच्या या कामांत दिसे, असा माझा तरी समज आहे.सूक्ष्म भेद सोडला तर दोघांचंहि फाल्गुनरावाचं काम अविस्मरणीय ठरलं. १९०८ सालपर्यंत तरी बालगंधर्व हे अभिनयदृष्ट्या चमकले नाहीत. "अहो, तुमच्या या बालगंधर्वाला अजून वायकी चालणं आणि उभं राहणं देखील आलेलं नाही—पाठांतर एकजात गुळगुळीत; मुरड नाही कीं खटका नाही, टोन तर दूरच"—असे उद्गार देवलमास्तरांनीं काढल्याचें गोविंदराव टेंबे यांनी आपल्या 'जीवनविहार' या पुस्तकांत नमूद केलं आहे. परंतु याचा दोष देवलांचेकडे जास्त प्रमाणांत जातो. कारण भूमिका समजावून देण्याचा भाग खाडीलकरांच्या शिक्षणांत जसा असे तसा देवलांचा नसे. देवल सांगतील तसं टोनिंग आणि अभिनय नटानं करायचा. ही यांत्रिक पद्धतीच देवलांची होती. कोल्हटकरांच्या प्रेमशोधनाच्या तालमी खाडीलकरांनीच घेतल्या. बालगंधर्वांची या नाटकांतील आणि मानापमानांतील भामिनीची या दोन्ही भूमिका अभिनयदृष्ट्या आकर्षक ठरल्या, तें कां, हें आतां निराळं सांगण्याची गरज नाही. बालगंधर्व फारसे शिकलेले नाहीत तेव्हां स्वतः कल्पना चालवून ते एखादी भूमिका करतील अशी अपेक्षा करण्यांत अर्थ नव्हता. "परंतु दुसऱ्यानं त्यांना कोणतीहि भूमिका एकदा समजावून दिली आणि तें नाटक त्यांना आवडलं असलं, म्हणजे मात्र न कंटाळता पूर्ण नादीपणानं, मनोभावानं ती भूमिका वसवून रंगभूमीवर उठावदार करतील." असं जें बोडस यांनी लिहून ठेवलं आहे तेंच सत्य आहे. भामिनी आणि रेवती या त्यांच्या भूमिका अभिनयदृष्ट्या मला विशेष आवडल्या. मात्र रंगभूमीवरील त्यांच्या यशाचं खरं मर्म त्यांच्या गायनांत आहे. त्यांच्या ऐन ज्वानींत मलकाजान, गोहरजान वगैरेंचं लोकप्रिय गायन त्यांनी आत्मसात् केलं आणि त्या जोरावर महाराष्ट्राला कित्येक वर्षं अखंडपणे झुलवलं. त्यांच्या गाण्याला रसगुल्ला या पक्वान्नाची—अगर साखरेच्या पाकांतल्या, रसरशीत पाक ठिपकत असलेल्या जिलबीची उपमा शोभेल असं बोडस म्हणतात, तें तंतोतंत खरं आहे. सगुणोपासक आपल्या उपास्यदेवतेची पूजा यथासांग षोडशोपचारांनीं करण्यांत भक्तीनं रंगून जातो, त्याप्रमाणें बालगंधर्व आपल्या रंगदेवतेची पूजा करण्यांत अगदी गढून गेलेले असतात." हें त्यांच्या अभिनयाविषयींचं कारखानीसांचं मत विचारप्रवर्तक नाही असं कोण म्हणेल ? गोविंदराव टेंबे हे गायन, अभिनय आणि भूमिकेचा आविर्भाव या दृष्टीनं कचाची भूमिका फक्त सुंदर वठवीत. संशयकल्लोळांतील रेवतीची भूमिका सर्व दृष्टीनं उत्कृष्ट अशी करून श्री. रघुवीर सावकार यांनी नट म्हणून आपली कीर्ति अजरामर करून ठेवली. वृंदावन आणि घनःशाम या चिंतामणराव कोल्हटकरांच्या दोन भूमिका माझ्या मतें अप्रतीम होत असत. कमतनूरकर यांच्या 'श्री' नाटकांतील नानासाहेब फाटक यांचं नितांतसुंदर काम पाहून मला फार आनंद झाला. उत्तम अभिनयाला जरूर असे पुष्कळ नैसर्गिक गुण फाटकांच्या अंगीं आहेत अशी माझी खात्री झाली. भाववंधनांतील कामण्णांच्या भूमिकेमुळे दिनकर ढेरे जरी प्रसिद्धीस आले असले तरी त्यांचें खरें अभिनयकौशल्य वीर विडंबनांतील उत्तराच्या भूमिकेंतच मला प्रकर्षानं दिसून आलं.

आतांपर्यंत उल्लेखिलेल्या नटांचें सामर्थ्य जमेस धरूनहि मला तरी असाच निष्कर्ष काढावासा वाटतो कीं, अभिनयकलेचा दर्जा वाढवण्याचं, संगीताशिवायही परिणामकारक नाट्य निर्माण होऊं शकतं हें पटवून देण्याचं, आणि गायकाजवळ जर अभिनयकला असेल तरच त्याला नट म्हणतां येईल हें सिद्ध करण्याचं मुख्य श्रेय महाराष्ट्रमंडळींतील नटवर्ग आणि खाडीलकर यांच्या प्रभावी युतीला आहे. लेखकाला अभिप्रेत असलेल्या परंतु अनेक कारणांमुळं पात्रांच्या स्वभावचित्रणांत त्याचे हातून प्रगट न झालेल्या अशा गोष्टी, आपल्या अभिनय कौशल्यानं एखाद्या नटानं प्रेक्षकांस दाखवल्या म्हणजे त्यानं ती भूमिका निर्माण केली असं म्हणतां येईल. ह्याहि बाबतींत महाराष्ट्र मंडळीनं वैशिष्ट्य दाखवलं. गणपतराव भागवतांनी केशव शास्त्री व कीचक, कारखानीसांनी दुर्जनसिंग, दात्यांनी म्हाळसा व हरिश्चंद्र, औंध-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

करांनी विचित्र लीलेंतील तुळशी, शाळीग्राम यांनी संभाजी, त्र्यंबकराव प्रधानांनी वायकांच्या वंडांतील गांजेकस, मामा भट यांनी तारामंडळांतील भामिनी, पोतनिसांनी मत्स्यगंधेतील गौरी आणि मामांच्या 'कुंज-विहारी' नाटकांतील राजारामें सोहोनींनी पेंद्याची या भूमिका माझें मतें तरी खरोखरीच निर्माण केल्या. सत्तेच्या गुलामांतील पेंढारकरांची वैकुंठाची आणि रघुवीर सावकार यांनीं संशयकल्लोळांत केलेली रेवतीची, याहि भूमिकांबद्दल असंच म्हणतां येईल. रंगभूमीचा अनुभव असलेला बुद्धिमान नट प्रयोगदृष्टया चांगलं नाटक लिहूं शकतो हें आप्पा टिपनीस, औंधकर, वोडस, गोविंदराव टेंब्रे, आणि कारखानीस यांनी सिद्ध केलं. मात्र सखोल विचारसरणी, तर्कशुद्ध मांडणी आणि बुद्धिवैभव हे गुण कारखानीसांच्या 'राजाचें बंड' आणि 'स्वैरिणी' या नाटकांत जसे प्रकर्षानं दिसतात, तसे इतर नट नाटककारांच्या कृतींत दिसत नाहीत. नटवर्य हा किताब मिळण्याइतकी दात्यांनी जी कीर्ति मिळवली त्याचं खरं श्रेय, त्यांच्यांतील इतर नैसर्गिक आणि परिश्रमानं कमावलेले गुण जमेस धरूनहि त्यांच्या मूक आणि सूचक या विशिष्ट अभिनय-पद्धतीलाच आहे, असं मला तरी वाटतं. शरीरांतील डोळे, मुद्रा, हातापायाचीं बोटें वगैरे अवयवांच्या द्वारें योग्य वेळीं योग्य ठिकाणीं आणि नाजूक मार्मिकतेनं ते अभिनयवैशिष्टय दाखवतात. भूमिकेशीं ते चटकन समरस होतात. मात्र भूमिकेचा संचार म्हणून ज्याला म्हणतात तो त्यांच्यापेक्षां भागवत आणि कारखानीस यांच्या कामानंच मला दिसून आला. शरीरसौंदर्य, आवाज वगैरे नैसर्गिक गुण अंगी नसतांना बुद्धिमत्ता, शिस्त, व्यासंग आणि परिश्रम यांच्या जोरावर नट म्हणून मनुष्य किती उच्च पदावर जाऊं शकतो याचं, मराठी रंगभूमीच्या इतिहासांत भागवत हें उत्कृष्ट उदाहरण आहे. स्त्रियांचीं कामं स्त्रिया करूं लागल्या-पासून ज्या नटी रंगभूमीवर आल्या त्यांत ज्योत्स्ना भोंळे, लीला चिटणीस, मंगला रानडे आणि स्नेहप्रभा प्रधान प्रमुख आहेत. ज्योत्स्नाबाईंची आंधळयांच्या शाळेंतील बिंबेची भूमिका अभिनयदृष्टया अद्वितीय ठरली. त्या आणि दाते यांची या सबंध नाटकांतील अभिनयाची साथ म्हणजे उत्कृष्ट अभिनयाचा एक आदर्शच होता. कुलवधूंतील कामामुळे त्यांनीं चांगलाच लौकिक मिळविला. रंगभूमीवर रसानुकूल गायन त्या उत्तम रीतीनें गातात. 'उसना नवरा' या नाटकांत लीला चिटणीस यांनी रंगभूमीवर प्रथम पदार्पण केलें. त्यांचं तें काम पहातांच उत्तम नटी म्हणून त्या कीर्ति मिळवतील असं मी भाकीत केलं होतं. रंगभूमीवर त्या फार वेळ राहिल्या नाहीत. पण चित्रपट सृष्टींत हें भाकित खरं ठरलं– या त्यांच्या मूक आणि सूचक अभिनयपद्धतीचं मला पुन्हा जें दर्शन झालं तें लीला-बाईंच्या चित्रपटांतील कामांत. लेखकाला जो अगदी थोडें लिहायला लावतो तो खरा नट हा सिद्धांत माझ्या मतें दात्ये आणि लीलाबाई यांच्या अभिनयांत जास्त दिसतो. रेखीव अभिनय आणि स्पष्ट परंतु लयबद्ध वाणी हे गुण मंगला रानडे यांच्यांत विशेषत्वानं दिसतात. स्नेहप्रभा प्रधान या अत्यंत बुद्धिमान व अष्टपैलू नटी आहेत हीं गोष्ट त्यांचं राणीबागेंतील काम पाहून कोणीही मान्य करील. आतांपर्यंत ज्या नटनटींच्या अभिनय कलेविषयीं उहापोह केला त्यावरून पहातां त्यापैकीं प्रत्येकानं मराठी नाटकाला उत्कर्षाच्या स्थितीला नेण्यांत आपआपल्या मगदुराप्रमाणं चांगला हातभार लावला आहे असं म्हणण्यास हरकत नसावी असं वाटतं.

(आकाशवाणी नागपूर केंद्राच्या सौजन्याने.)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठी वाङ्मयाची इंग्रजींतील अनुचित ओळख

★ ★ ★ लेखक **राजशेखर** ★ ★ ★

नहि प्रियं प्रवक्तुमिच्छंति मृषा हितैषिणः ।।

'संघटित आशिया' (United Asia) नांवाचें एक इंग्रजी मासिक – पुस्तक मुंबईहून निघत असतें. या मासिक पुस्तकाच्या मार्च १९५४ च्या अंकांत मराठी साहित्यासंबंधीं चार लेख प्रसिद्ध झालेले आहेत. 'स्वातंत्र्याचा साहित्यावर परिणाम' या विषयावरील संपादकीयांत या अंकांतील लेखांचें स्वरूप दिग्दर्शित केलें आहे. मराठीप्रमाणेंच गुजराती, बंगाली, उर्दू, हिंदी, तेलगु, पंजाबी, कानडी, मल्याळम्, तमिळ, या भाषांमधील साहित्यावर स्वातंत्र्याचा कसा प्रभाव पडला आहे याचें दिग्दर्शन करणारे लेख 'परिसंवाद' (Symposium) म्हणून संग्रहित केले आहेत. आज आम्हीं या अंकांतील मराठी वाङ्मयाचें विवेचन करणाऱ्या चार लेखांसंबंधी थोडेसें लिहिणार आहों. या टीकालेखांचे कर्ते मुंबईइलाखानिवासी चार प्राध्यापक आहेत. या प्राध्यापकचतुष्टयानें ही लेखनकामाठी करून स्वतःपुरती थोडीशी आंतरप्रांतीय व आंतरभाषीय कीर्ती मिळवली असेल, पण मराठी साहित्याची अनुचित ओळख करून दिल्याबद्दल मराठी रसिकांकडून व साहित्यकारांकडून त्यांना दूषणच मिळेल. मराठी वाङ्मयाची इंग्रजींत ओळख करून देण्याचे मागे कांही प्रयत्न झालेले आहेत. प्रा. मा. दा. आळतेकर या मराठी विषयाच्या अध्यापकानें जयपूर येथें भरलेल्या 'पी. ई. एन्' परिषदेंत दिलेलें हास्यास्पद व्याख्यान, श्री. रा. टिकेकर यांनी १९४७ सालीं लिहिलेला लेख, प्रा. रा. श्री. जोगांचा लेख आणि प्रि. गो. चि. भाटे यांचा 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' हीं उदाहरणें आम्हांस आठवतात. वर निर्देश केलेल्या लेखकमजकुरांनी अत्यंत सद्हेतुनें लिहिलेल्या लेखांत मराठी वाङ्मयाचें अवमूल्यन व विच्छेदन अभावितपणें झालेलें होतें. अनुदार अनुल्लेख, अप्रशस्त प्रशस्ति, विपर्यस्त विधानें व आचरट मीमांसा यांनी ते लेख पुरेपूर भरलेले होते. परंतु त्या लेखकांकडून विश्लेषण, विवेचन, अगर सखोल मीमांसा यांची अपेक्षा कोणीच केलेली नव्हती. आळतेकर अगर टिकेकर यांना वाङ्मयविवेचक म्हणून कोणीच ओळखत नाही. 'पी. ई. एन्' सारख्या परिषदांतून मिरवणारे उत्सवमूर्ति म्हणूनच हे ख्यातनाम झाले आहेत. पण तशी गोष्ट राजाध्यक्ष, क्षीरसागर यांची नाही. प्रा. श्री. के. क्षीरसागर हे उत्कृष्ट विवेचक म्हणून प्रसिद्ध आहेत. अलिकडे प्रा. मंगेश राजाध्यक्ष यांनीहि कांही बरे टीकालेख लिहिलेले आहेत व ते त्यांच्या अभ्यासू वृत्तीची साक्ष पटविणारे आहेत. प्रा. वा. ल. कुळकर्णी यांचे टीकाग्रंथ तर सुप्रसिद्धच आहेत. प्रा. रा. भि. जोशी या गृहस्थांना मात्र विवेचक म्हणून कोणीच ओळखत नाही. उर्दूभाषें-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तील कांही बऱ्यावाईट कथा अनुवादित करणारा व प्रवासलेख लिहिणारा एक सामान्य लेखक म्हणूनच त्यांची प्रसिद्धी आहे. (या गृहस्थांचा उर्दूप्रमाणेंच संस्कृताचा व्यासंग असल्याची नवलकथा 'संघटित आशिया' या मासिकाच्या अंकांत प्रथमच प्रसिद्ध करण्यांत आलेली आहे.) या अनधिकारी गृहस्थाकडून चांगल्या साहित्य-विवेचनाची अपेक्षा करणेंच चुकीचें होईल.

प्रा. राजाध्यक्ष यांनी पूर्वी 'Illustrated Weekly' च्या एका अंकांत आजच्या मराठी साहित्याचें स्वरूप वर्णन करणारा एक लेख लिहिलेला होता. तोहि अपुऱ्या माहितीच्या आधारें लिहिलेला होता. एक दोन विशिष्ट मासिकांत झळकणाऱ्या साहित्यकारांच्या साहित्याचा आढावा घेणारा तो लेख 'प्रातिनिधीक' स्वरूपाचा खासच नव्हता. या अंकांतील लेखांचें स्वरूप भिन्न आहे. 'स्वातंत्र्योत्तर साहित्याचें स्वरूप' व 'स्वातंत्र्याचा वाङ्मयावर झालेला परिणाम' या दोन उद्देशांनुसार विवेचन करावयाचें होतें. प्रा. राजाध्यक्ष, कुलकर्णी व रा. भि. जोशी यांच्या लेखांत बरहुकूम एकसारखें विवेचन झालें आहे. तसेंच विशिष्ट साहित्यकारांचींच नावें फडकविलीं आहेत. जणुं कांही तिघांनी एकत्र बसूनच तीन भिन्न लेख लिहिलेले आहेत. तसें नसल्यास त्यांच्या ऐकमत्याची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. 'संघटित आशिया'च्या संपादकांनी मराठी साहित्यावरील चार लेख छापण्यांत कांहीच योजकता दाखविलेली नाही. क्षीरसागर आणि राजाध्यक्ष यांच्या दोन लेखांनी कार्य झालें असतें. या लेखांत कोठेंहि सखोल विश्लेषण, वाङ्मयमूल्यांचें उद्घाटन, मराठी साहित्यांतील विचारगर्भ वाङ्मयाचा निर्देशहि नाही. काव्य आणि कथा या दोन क्षेत्रांतील वाङ्मयकारांचे उल्लेख (त्यांतहि गटबाजी, अपविधानें, अनुचित स्तुति) आणि ठोकळ विवेचन करण्यांत आलें आहे. मुंबईनिवासी लेखकांनीं रेगे यांचा मर्ढेकरांबरोबरच आवर्जून उल्लेख केलेला आहे. रेगे या कविवराची अतिरंजित प्रशस्ति करण्यांत या तिघांनीहि कमी केलेलें नाही. गाथा सप्तशती, लावणी वाङ्मय, वेंचक संस्कृत काव्य यांच्या अभ्यासावर आपल्या शृंगारिक काव्याची भट्टी उतरवणारा, क्षणिका आणि कणिका लिहिणारा हा विदुःस्त्रावी कवि आजकाल बराच प्रसिद्धी पावत आहे. इंदिरा संत नामक एका कवयित्रीनें केव्हांतरी एकदां मुंबई साहित्य संघाच्या व्यासपीठावरून मर्ढेकर व रेगे हे कवि तिला आवडत असल्याचें उद्‌गारिलें आणि मग काय मुंबापुरनिवासी सान थोर साहित्यकारांनी रेगे यांच्या नांवाचा दुल्ला उभा केला व त्यांची अतोनात प्रशस्ति आरंभिली. साहित्यांत कमी समज असलेल्या परंतु जणु कांही मराठी साहित्याचें संवर्धन आपल्याच अंगावर येऊन पडलें आहे असा गैरसमज करून घेतलेल्या एका संपादकशौंडानें तर 'मर्ढेकर व रेगे यांची वाटचाल' अशी नवकाव्याची अगदीं अवास्तव 'जाहिरात' करून टाकली. मराठी साहित्याची सेवा करण्याची प्रामाणिक इच्छा जरी असली तरी असमंजसपणामुळें व दांभिकतेचा बळी झाल्यामुळें या संपादकानें स्वतःला हास्यास्पद करून घेतलें आहे. राजाध्यक्ष, जोशी आणि कुलकर्णी यांना आमचें जाहीर आव्हान आहे कीं, त्यांनी पु. शि. रेगे या कवीच्या काव्यांतील नितांत नाविन्य अगर मौलिकता या विषयावर यथास्थित उपपादन करावें व आमच्यासारख्या अजाण काव्यास्वादकांची रेगे यांच्या काव्यांतील 'नाविन्या'संबंधी खात्री पटवून द्यावी. रेगे हे Pioneer आहेत, नवकाव्याचे मर्ढेकरांप्रमाणेंच अग्रणी आहेत, अशीं ठोकळ विधानें वाङ्मयविवेचनाच्या क्षेत्रांत मुळींच चालावयाचीं नाहीत. संस्कृत काव्याचा आस्वाद घेतलेल्यांना रेगे यांच्या काव्यांत फारसें 'नव' आढळण्याचा संभव नाही. प्राकृत जनांनाही फारसें आवडण्यासारखें रेगे यांच्या काव्यांत आढळत नाही. कारण लावणीवाङ्मयांतील मस्त धुंदी व कामस्फूर्ति आणि गाथासप्तशतींतील मधुर प्रेमकाव्य त्यांच्या परिचयाचें आहे. राजाध्यक्ष म्हणतात, Sex is

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

shorn of the hypocritical and the unclean which veiled it all these years. हें विधान संपूर्णपणें चुकीचें आहे असें आम्ही निःशंकपणें म्हणतो. कारण लावणीवाङ्मयांत जरी रांगडेपणा असला तरी दांभिकता नाही. अर्वाचीन मराठी काव्यांतील माधुरी ज्याच्या परिचयाची आहे, तो असें कधींच म्हणणार नाही कीं, मराठी काव्यांतील शृंगार हा विकृत स्वरूपाचा होता. मराठींतील एका रससिद्ध कवीनें—स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं— लिहिलेलें 'कमला' काव्य वाचा अगर संस्कृतापासून स्फूर्ति घेऊन लिहिलेलें बोवडे यांचें शृंगारिक काव्य वाचा. रेगे यांच्यापेक्षां कितीतरी पटीनें सरस, उत्कट व लोलंगतापूर्ण काव्य मराठी कवींनी निर्माण केलें आहे. सांद्र आणि सोज्वळ भक्तिरसांत विरून जाणारीं मधुर प्रेमगीतें वाचावयाचीं असतील तर अनिलांची 'फुलवात' वाचा. विशुद्ध प्रणयाचीं गीतें वाचावयाचीं असतील तर तांब्यांचीं प्रेमगीतें वाचा. आणि मग रेगे यांनी नवीन असें काय लिहिलें आहे तें सांगा. स्वातंत्र्योत्तर काळांत आमच्याकडे 'लैंगिक' काव्य दांभिकतेपासून व उल्लूपणापासून मुक्त झालें, हें म्हणणेंहि अत्यंत विपर्यस्त आणि अज्ञानजन्य आहे. रेगे यांनी शुद्ध, ऋजु स्वरूपाचें शृंगारिक काव्य लिहिलें म्हणावें तर तेंहि नाही. कारण 'ओटिपोटावरच्या लहरी' 'रोमावली' 'काशाच्या मांड्या' 'जोवन किल्ले' इत्यादि त्यांच्या वैषयिकतेनें परिपूर्ण असलेल्या भडक वर्णनांचा व गलिच्छ संकेतांचा दाखला देतां येईल. रेगे यांच्या काव्यापेक्षां रांगडें लावणीवाङ्मय बरें! असें असतांना रेगे यांची थोरवी वाढविण्याचें कारण काय? एक कवयित्री आपला अभिप्राय देते काय आणि अखिल मुंबापुरनिवासी लहानसान लेखक व संपादक अज्ञानानें, अरसिकतेनें व दुराग्रहानें त्या भ्रामक विधानाचा प्रसार करतात काय! यांच्या जल्पनेकडे आम्ही लक्षहि दिलें नसतें, परंतु या मतिभ्रमाचा प्रसार आता इंग्रजींतून होणार व परप्रांतीय वाचकांचीहि फसगत होणार, म्हणून आम्हांस हा मजकूर टोंचून लिहावा लागत आहे. मर्ढेकरांच्या बरोबरीनें रेगे यांचें नांव घेणें चुकीचें आहे. मर्ढेकरांचें काव्य संपूर्णपणें निराळें असून त्यांच्या काव्याचें सांगोपांग विवेचन कोणीतरी करावयास पाहिजे होतें. कदाचित् पृष्ठसंख्येचें बंधन आड आलें असावें. मर्ढेकरांप्रमाणें आपल्या दृढ सामाजिक आशयाच्या काव्यामुळें प्रसिद्धीस आलेले मुक्तिबोध, त्यांच्याही काव्याचें विवेचन झालेलें नाही. राजाध्यक्षांनी केवळ नामोल्लेख केलेला आहे, परंतु त्यांच्या ' नवी मळवाट ' या काव्यसंग्रहाचें नांव मराठी ग्रंथांच्या यादींत अंतर्भूत झालेलें नाही. ती सूचि फारच हास्यास्पद आहे. गोरे नामक एका ग्रंथपालानें '१९४७ नंतरचें मराठी साहित्य' अशी एक सूचि तयार केलेली आहे. ती याच अंकांत छापण्यांत आली आहे. काव्यग्रंथांच्या यादींत माधव ज्यूलियनांच्या काव्यसंग्रहांचीं नांवें छापण्यांत आलीं आहेत. खरें पाहिलें असतां ते काव्यग्रंथ १९४७ पूर्वीच प्रसिद्ध झालेले असून अलिकडे त्यांच्या आवृत्त्या प्रसिद्ध झालेल्या आहेत. तें काव्य १९४७ नंतरचें आहे असें भासविण्यांत काय अर्थ आहे? अर्थात अज्ञानापोटीं हा गुन्हा झालेला आहे. 'सप्तसरिता' हा मालती किर्लोस्कर यांनी संपादित केलेला संग्रह या यादींत समाविष्ट झालेला आहे, पण मुक्तिबोध, भ. श्री. पंडित, वसंत बापट यांच्या संग्रहांचीं नांवें मात्र वगळण्यांत आलेलीं आहेत. खांडेकरांनी संपादित केलेल्या एका पुस्तकाचें नांव दडपून देण्यांत आलें आहे, पण १९४७ सालीं प्रसिद्ध झालेल्या 'रुद्रवीणे'चें अगर वसंत बापटांच्या 'बिजली'चें विस्मरण झालेलें दिसतें. ग्रंथपालबोवांनी सूचि – संपादनासाठीं फारसे परिश्रम केलेले दिसत नाहीत आणि मौजेची गोष्ट अशी कीं, ज्या कविश्रेष्ठाचें नांव अगत्यानें उल्लेखित झालें आहे, त्याच्या 'दोला' अगर 'गंधरेखा' या संग्रहांचा त्या सूचींत अंतर्भाव नाही. असो. मुक्तिबोध व अनिल यांच्या कवितेचें स्वरूप थोडक्यांत सांगावयास पाहिजे होतें. तसेंच बापट यांच्या कांही कवितांचा निर्देश व्हावयास पाहिजे होता. Mardhekar and Rege were the pioneers with Muktibodh and Karandikar close enough to be in

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

the vanguard असें केवळ म्हणून चालणार नाही. मर्ढेकरांच्या वैचारिकतेचें व मुक्तिबोधांच्या काव्यांतील वास्तवतेचें संक्षिप्तरूपांत दिग्दर्शन व्हावयास पाहिजे होतें. वाङ्मयीन मूल्यांचा विचार करून जर लेख लिहिले असते व मराठी वाङ्मयांतील अंतःप्रवाहांचें सूक्ष्म ज्ञान असतें, तर केवळ नामोल्लेखाऐवजीं सखोल विश्लेषण व विवेचन झालें असतें. पण केवळ व्यक्ति-प्रेमामुळें व वाङ्मयीन गटबाजीमुळें या सर्व लेखांतील विवेचन जुजबी व चुकीचें झालेलें आहे. राजाध्यक्ष कुलकर्णी व जोशी या तीनहि टीकाकारांना सामाजिक व राजकीय दृष्टिकोन नसल्यामुळें त्यांनी स्वातंत्र्योत्तर काळांतील साहित्याचें केलेलें विवेचन दिशाभूल करणारें झालें आहे. सामाजिक अन्यायाचें रसरशीत वर्णन करणारी व समष्टिकल्याणाचें ध्येय दिग्दर्शित करणारी मुक्तिबोधांची उत्कट कविता स्वतंत्र लेखाचा विषय होऊं शकली असती. निदान मर्ढेकरांप्रमाणेंच मुक्ति-बोधांचा उल्लेख व्हावयास पाहिजे होता. मर्ढेकरां-प्रमाणेंच मुक्तिबोध हे Pioneer आहेत. त्यांच्या काव्याचें स्वरूप निराळ्याच प्रकारचें आहे. कुसुमाग्रज, व बोरकर यांच्या कांही कवितांचा उल्लेख व्हावयास पाहिजे होता.

जी कथा काव्याची तीच कथा कथा–साहित्याची. भावे, गाडगीळ, गोखले, माडगूळकर या कथाकारांचीं संध्येंतल्या नांवाप्रमाणें नांवें जपलीं आहेत. भावे यांनी लिहिलेल्या 'नौका' 'प्रायश्चित्त' इत्यादि नौखाली विष-यक कथांचा उल्लेखही नाही. क्षीरसागरांनी मात्र 'अंकुर' या कथेचा उल्लेख केलेला आहे. निर्वासितांच्या जीवनावर लिहिलेल्या भावे यांच्या इतर कथांचा उल्लेख व्हावयास पाहिजे होता. स्वातंत्र्योत्तर काळांतील साहित्याचें विवेचन करावयाचें असल्यामुळें या कथांचा उल्लेख इष्ट होता. पेंडशांच्या 'एल्गार'चा उल्लेख क्षीरसागरांनी केलेला आहे.

क्षीरसागरांचा लेख हें एकच आशास्थान आम्हांस गवसलें. त्यांनी दिलेला विषय समजून घेऊन आपला लेख लिहिलेला आहे व थोडक्यांत मराठी साहित्याचें आजचें स्वरूप वर्णन केलें आहे. त्यांचींहि कांही विधानें टीकास्पद आहेत. अरविंद गोखले हेच एकटे स्वातंत्र्योत्तर काळाचें चित्रण करणारे प्रामाणिक कथाकार आहेत, हें विधान मान्य होण्यासारखें नाही. भावे यांच्या कथांतहि आजच्या जीवनाचें दर्शन घडतें. भावे यांच्या कांही कथा (उदाहरणार्थ : फाटलेलें आकाश, यंत्र.) आजच्या मध्यमवर्गाचें उत्कृष्ट चित्रण सादर करतात. गाडगीळ मात्र आत्मनेपदी लेखन करणारे गृहस्थ आहेत. भाव्यांच्या कथा गोखल्यांच्या कथांपेक्षां जास्त प्रभावी आहेत. त्यांच्या 'मुक्ति' 'सावल्या' या दीर्घकथांनी मराठी कथासाहित्यांत मानाचें स्थान मिळविलें आहे. त्यांचा निर्देश व्हावयास पाहिजे होता. स्थलाभावीं तें शक्य झालें नसेल. चार लेखकांकडून टीकालेख लिहवून घेण्यापेक्षां मासिकाच्या संपादकांनी एकट्या क्षीरसागरांकडून एक सविस्तर, सांगोपांग विवेचन करणारा लेख लिहवून घेतला असता तर बरें झालें असतें व मराठी वाङ्मयाची अनुचित ओळख झाली नसती.

कादंबरीच्या क्षेत्रांत पेंडसे यांचा उल्लेख सर्वांनीच केला आहे व तो यथार्थ आहे. वसंत कानेट-करांच्या 'पंख' व 'घर' या कादंबऱ्यांचा परामर्ष घ्यावयास पाहिजे होता. तसेंच विवलकरांची 'शुभा' श्रीधर देशपांडे यांची 'पाऊलवाट' दांडे-करांच्या 'शितू' या कादंबऱ्यांचा निर्देश व्हावयास पाहिजे होता. मराठी साहित्याचें आजचें स्वरूप वर्णन करतांना त्यांतील वैविध्य व मौलिकता यांचें दिग्दर्शन करावयास पाहिजे होतें. तसेंच त्यांतील विचारसंघर्षाचें विवेचन व्हावयास पाहिजे होतें. तसेंच साहित्यविवेचनाच्या क्षेत्रांतील वादांचा उल्लेख करा-वयास पाहिजे होता.

या अंकांत मराठी ग्रंथांची संदर्भ–सूचि छापण्यांत आलेली आहे. कादंबऱ्यांच्या यादींत गोखले यांच्या 'मीलन' या कथासंग्रहाचें नांव दडपून दिलेलें आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तसेंच ज्या जुन्या कादंबऱ्यांच्या आवृत्या १९४७ नंतर निघाल्या त्या नव्याच कादंबऱ्या समजून या यादींत अंतर्भूत करण्यांत आलेल्या आहेत. विभावरी शिरूरकर यांची 'जाई' व 'वळी' कानेटकरांची 'पंख' भाव्यांची 'अकुलिना' या कादंबऱ्यांचा अंतर्भाव व्हावयास पाहिजे होता. गद्रे, जोशी, सरदेशपांडे, कर्णिक इत्यादि अप्रसिद्ध कादंबरीकारांचीं नांवें या Select bibliography मध्यें प्रसिद्ध झालेलीं आहेत. नाटकांच्या यादींत अलिकडील कांही चांगल्या नाटकांचा उल्लेख नाही. कोणा एका चाफेकर नामक लेखकाच्या (कीं, लेखिकेच्या) 'वलिदान' नाटकाचें नांव दडपून देण्यांत आलें आहे. 'किरकोळ' मध्यें गोऱ्यांच्या 'सीतेचे पोहे' या कथासंग्रहाचा उल्लेख आहे, पण भावे, गोखले, गाडगीळ,माडगूळकर यांच्या संग्रहांचा उल्लेख नाही.दांडेकरांच्या 'मराठी साहित्याच्या इतिहासाची रूपरेषा' या ग्रंथाचा उल्लेख आहे,पण भ. श्री.पंडित यांच्या 'आधुनिक मराठी कविता' या ग्रंथाचें नांव गळलें आहे. विवेचनात्मक ग्रंथांत शं. बा. जोशी यांच्या 'मऱ्हाटी संस्कृती'चा उल्लेख आहे, पण इरावतीबाईंच्या 'मराठी संस्कृती'ला वगळण्यांत आलेलें आहे. 'चरित्रें आणि संस्मरणें' यांच्या यादींत दि. के. बेडेकरांच्या 'साहित्यनिर्मिती आणि स्वरूप' या टीकाग्रंथाचा समावेश केला आहे. या सूचींतील वेडगळपणाचीं अनेक उदाहरणें देतां येतील.

आम्हांस आश्चर्य वाटतें कीं, United Asia चा हा अंक मार्चमध्यें प्रसिद्ध झाला, पण त्या अंकांतील सूचीसंबंधीं व लेखांतील उणीवांसंबंधी आमच्या मुंबईपट्टणस्थ पत्रकारबंधूंनी कांहीच कसें लिहिलें नाही? मराठी वाङ्मयाच्या संवर्धनाचें उद्दिष्ट हृदयांत वागवणारे येवढे आमचे मराठी पत्रकार, पण त्यांनीही या लेखांबाबत मुग्धता स्वीकारलेली दिसते. मराठी पत्रकारांचें हें वर्तन पाहून शास्त्रीबोवांच्या दृष्टांतांतील टिट्टिभ पक्ष्याची आठवण होते. मराठी साहित्याच्या विकासार्थ श्रमी होणारे हे संपादक, मराठी वाङ्मयाची इंग्रजींत झालेली ही अनुचित ओळख पाहूनसुद्धां शांतचित्त राहूं शकतात. कारण लेखांचे कर्ते त्यांच्या मर्जीतले व त्यांच्या लेखकवर्गांत मोडणारे. या संपादकांना व इतर टीकाकारांना मरहूम 'अभिरुची'तील 'निषादा'प्रमाणे आम्हीं सांगूं चहातो कीं,

"असल्या बेजबाबदारपणाची भावडेपणानें उघड दखल घेणारे आमच्यासारखे टीकाकार छिद्रान्वेषी आणि त्यासंबंधीं मूग गिळून तोंडदेखल्या हास्यानें प्रसंग साजरा करणारे टीकाकार समतोल या आजच्या शिष्टाचारामुळें हें असेंच चालणार! आम्ही टीका करतो तेव्हां आम्ही 'ख्यातनाम टीकाकार' (राजाध्यक्षांप्रमाणें*) होण्याची भीति नाही."

– दिनांक १६ मे १९५४

(*कंसांतील मजकूर आमचा)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'जिप्सी'चें अंतरंग

★ ★ ★ लेखक : वा. रा. कान्त ★ ★ ★

'धारानृत्य' हा श्री. मंगेश पाडगांवकरांचा पहिला संग्रह प्रसिद्ध झाला, तेव्हां महाराष्ट्राचे ख्यातनाम कादंबरीकार व टीकाकार श्री. वि. स. खाण्डेकर यांनी त्या पुस्तकाकडे पाहून 'कळयांची फुलें कशीं झालीं !' असा सकौतुक संभ्रम व्यक्त केला आणि तांबे—बोरकर या कवींच्या काव्याशी त्यांचें जवळचें नातें जोडलें. याउलट, धारानृत्याच्या प्रस्तावनेंत, आचार्य भागवतांनीं मानवतावादाच्या' ध्वनीचा पाडगांवकरांच्या कवितेंत परिणामकारक आविष्कार' झाला, असे उद्‌गार काढले.पुण्याच्या साहित्यसंमेलनांत श्री. वि. द. घाटे यांनीं 'उद्याचा कवि' म्हणून पाडगांवकरांची ओळख करून दिली, तर गेल्या वर्षीच्या दिवाळी अंकांतील काव्यांचें समालोचन करतांना एका टीकाकाराने त्यांची नवकवींत गणना केली आहे. त्यांच्या प्रस्तुतच्या 'जिप्सी' या दुसऱ्या काव्यसंग्रहाचें स्वागत करतांना प्रा. वा. ल. कुलकर्ण्यांनी, त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत, पाडगांवकरांना स्वतःचें 'आगळें कल्पनाविश्व' सांपडल्याचा निर्वाळा देऊन, एक भावजीवि व सौंदर्यजीवि कवि,असें त्यांचें वर्णन केलें आहे.भावजीवि व सौंदर्यजीवि हें विशेषण कोणत्याहि रससिद्ध कवीला लावितां येईल, आणि कुलकर्ण्यांच्या आगळया विश्वाच्या कल्पनेसंबंधी बोलायचें झाल्यास बालकवींच्या कल्पनाविश्वापेक्षा वेगळें विश्व पाडगांवकरांना सांपडलें आहे असें म्हणता येणार नाही. निसर्गसौंदर्याशी तन्मय झालेले बालकवि उद्‌गारतात—

' निर्झरमय काननमय गायनमय दिव्य जाहला देह '

आणि

' मग गूढ अमूर्ताचीं मधुगीतें गोड गावया लागे
आनंदरूप झाली मानवता, मृत्यु राहिला मागें '

जीवनाचें आनंदमय भव्य दर्शन त्यांना घडतें. निसर्गसौंदर्याशी समरस झालेल्या ज्या मनोवस्थेंतून हें जीवनदर्शन निर्माण होतें ती समरसता, ती तन्मयताच आपलें आगळें विश्व निर्माण करूं शकते. पाडगांवकर या मार्गावरील एक साधक आहेत, त्यांना त्यांचें विश्व सांपडलें,असें भविष्य आतांच वर्तविणें धाष्टर्याचें आहे.

' कुणी तरी साद घाली दूर अनंतामधून
एक जिप्सी आहे माझ्या खोल मनांत दडून '

असें पाडगांवकर म्हणतात. दूरची अनंताची हांक ऐकून त्यांच्या मनांतला दडलेला जिप्सी जागा होतो. परंतु या जिप्सींत, उन्मत्तपणे, बेफिकिरपणे जीवनाचा शोध घेण्याचा बेफाम भटकेपणा आहे असा प्रत्यय जिप्सी काव्यसंग्रहांतून येत नाही. ज्ञात विश्वाची चौकट त्याला जाचूं लागते, मांडलेला खेळ उधळून द्यावा असें त्याला वाटतें, पण क्षितिजाचा भेद करीत धावण्याची उद्दाम शक्ति त्याच्या नसांनसांतून वादळ मांडीत नाही, जिप्सीच्या या उफळत्या मनाला मार्ग फुटत नाहीत. त्याची सारी सृष्टि गूढ अज्ञात धुक्यांत बुडून जाते आणि मग त्याचें हृदय प्रेमजीवन, निसर्गसौंदर्य आणि अज्ञाताची हुरहूर यांभोवतीच घिरटया घालीत बसते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ही प्रवृत्ति म्हणजे कांहीं जिप्सीपणा (Bohemianism) नाहीं. किंवा प्रस्तावनाकारांनी म्हटल्याप्रमाणें जीवनाबद्दलचें केवळ कुतूहल म्हणजेहि जिप्सी वृत्ति नव्हे.

या जिप्सी प्रवृत्तीमध्यें सामाजिक अपराधाची एक जाणीवहि सुप्तपणें वसत असते. रूढांचीं बंधनें मोडून, बेहोष आनंदांत व स्वैर सुखोपभोगांत, ही अपराधाची सलणारी जाणीव बुडविण्याचा प्रयत्न या प्रवृत्तीच्या बुडाशी असतो. या दोन्ही प्रवृत्ति पाडगांवकरांच्या काव्यांत नाहीत. मग या काव्यसंग्रहाला जिप्सी हें नांव देण्यांत औचित्य कोणतें ?

पुस्तकाच्या नांवाचा मुद्दा महत्त्वाचा नाही. नांवांत काय आहे ? कोणतेंहि नांव चालेल. 'नांवांत मोहनी भासो सामान्यांशी' असें कविवर्य बी यांनी म्हटलेंच आहे. परंतु पाडगांवकरासारख्या सौंदर्य-शोधक साक्षेपी ऋजु कलावंताचा हा संग्रह आहे म्हणून नांवाचा हा गौण विचार सहज मनांत आला, तो बोलून दाखवला इतकेंच.

प्रस्तावनाकारांनी म्हटल्याप्रमाणें वैयक्तिक प्रेम-जीवन आणि निसर्गप्रेमांतून अनुभवास येणारें सौंदर्य-जीवन हेच पाडगांवकरांचे प्रमुख काव्यविषय आहेत. जिप्सी या संग्रहाचा बराचसा भाग प्रेमकवितेनें व्यापला आहे. मुग्ध, विश्रब्ध, आर्त आणि किंचित् विरक्त अशा प्रेमाचीं संयमित उदात्त भावचित्रें त्यांच्या काव्यांतून आढळतात. प्रेमाची हुरहूर, मीलनाची तृप्ति आणि त्या तृप्तींतहि अतृप्तीची एक वेदना यांच्या सूक्ष्म तरल भावानुभूति मोठ्या कोमलपणें त्यांच्या कवितांतून रेखाटल्या गेल्या आहेत. या भावांची अभिव्यक्ति करतांना त्यांचे शब्द रेशमाचे होतात आणि रेशमाच्या मऊ मुलायम धाग्यानें बोट कापावें ना ? अगदी तशी एक वेदना मनांत सलते. 'व्यथा,' 'माझे पंख मागूं नको,' 'अलगूज,' 'पांघरूण,' 'जवळपणाचें झालें बंधन,' ह्या प्रेमगीतांतून विविध मनोवस्थांचें चित्रण मोठें उत्कट झालें आहे. 'व्यथा' या काव्यांतल्या मानिनीच्या मनांत प्रियकराशी भांडल्यावर, अनुतापाचें वादळ उठतें. क्षमायाचनेसाठीं तडफडणारें पण याचनेचा धीर नसलेलें व्यथित हृदय अवचित प्रियकराला आपल्या दाराशी पाहून कोसळतें, कोसळतांना त्याच्याच छातीचा आधार घेतें आणि म्हणतें —

> 'शिर खुपसुनि वक्षीं स्फुंदस्फुंदुनि रडलें
> मी वादळांतल्या फुलापरी थरथरलें
> या चरणापाशी मीच निघालें होतें.
> वाटलें म्हणावें — परंतु शद्ब न फुटले.'

अभिमान आणि व्यथा यांच्या धगधगत्या रेषांनीं आणि अश्रूंच्या नील पुष्पांनी हें चित्र साकार व सजीव केलें आहे असें वाटतें. 'पांघरूण' या कवितेंतील शारीरिक भूक आणि भोगविरक्त उदात्त प्रेम यांच्यांतील झगडा भावोत्कटतेनें व सूचकतेनें रंगविला आहे. निद्रित स्वप्नांकित भोगलालस पण संयमी युवा आणि पहाटेच्या गार वाऱ्यानें जागी झालेली व्यथित आत्मवंचित मुग्धा यांच्यांत सळसळणारें तें परित्यक्त पांघरूण युगानुयुगे तसेंच भोगलालसा आणि प्रेम यांच्यामध्यें फडफडत तडफडत आहे आणि त्याचे पदर आपल्याला स्पर्शून जात आहेत असा भास होतो. 'अलगुज' या कवितेंत, वेगवेगळ्या वाटांनी जाणाऱ्या एकेकाळच्या प्रणयी जीवांच्या पुनर्भेटीचा क्षण प्रखर वास्तवतेनें आणि व्यथित संयमानें रंगलेला जहरी विडा बनला आहे. पूर्वीच्या जीवनांतला आनंदच तेवढा घेऊन आपापल्या वाटेनें जाणाऱ्या या प्रेमी जिवांचीं चित्रें करुणोदात्त आहेत. 'माझे पंख मागूं नको' आणि 'जवळपणाचें झालें बंधन' या कवितांत आत्मसमर्पणाच्या वेळींहि आपली अहंता व अस्मिता गमावण्यास तयार नसलेल्या ध्येयवादी जीवनाची वेदना आकाशाच्या निळ्या रंगानें चितारल्याप्रमाणें व्यापक, गूढ व उदात्त झाली आहे.

> 'रेशमी ही झुळझूळ धुंद निर्झराच्या कांठी
> इथे मरमली एकांत तुझ्यासाठी, तुझ्यासाठी
> जरी तुझाच निर्झर
> त्याची गति मागूं नको
> माझे पंख मागूं नको'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या प्रेमळ प्रामाणिक विनवणींतली व्यथा विद्ध पांख-राच्या पंखाच्या फडफडाटाप्रमाणें मनांत किती वेळ तरी नादत राहते.

प्रेमाच्या या विशुद्ध भावनेपलीकडे जाऊन, विशाल जीवनाच्या क्षितिजांचा वेध घेण्याची ओढहि पाडगांवकरांच्या प्रतिभेंत आहे. विषम, दुःखमय, पण ध्येयप्रेरित जीवनाचीं गाणीं, त्यांनी 'दुःख', 'हात हवे 'मज,' 'सुंदर आहे माझी वासना', 'जयजयहे पार्थिवते' 'कधीं पाहतो' या कवितांतून गाइलीं आहेत.

'व्योमांतुन उडतांना
ओढितसे मज घरटें
अन् उबेंत घरट्याच्या
क्षुद्र तेंच मज गमतें'

या ओळींतील क्षुद्र व उदात्त जीवनाची ओढ यांच्यांत पिचणाऱ्या मनाचें चित्र किती करुण व किती अर्थ–पूर्ण आहे. 'सुंदर आहे माझी वासना' आणि 'जय जय हे पार्थिवते' या कवितांतूनहि असेच उदात्त विचारानुभव व्यक्त झाले आहेत, परंतु त्यांतील तत्त्वज्ञानाचे दुवे कच्चे वाटतात आणि त्यांतील बराचसा भाग केवळ शब्दांचे फुगे भासतात.

'जय जय हे वृक्षांतिल पक्ष्यांतिल पार्थिवते
जय जय हे अन्नांतिल वस्त्रांतिल पार्थिवते'

या सारख्या ओळी गडकऱ्यांच्या महाराष्ट्रगीतांतील 'दगडाच्या देशा, कांटेरी देशा' अशा निरर्थक ओळींची आठवण करून देतात.

मानवी मनाच्या सूक्ष्म तरल ऊर्मी टिपून घेऊन, त्यांचें भावसौंदर्य हळुवारपणें प्रकट करण्याचें सामर्थ्य पाडगांवकरांत आहे. संवेदनेनें व सहानुभूतीनें भेदक आणि व्यापक होत जाणाऱ्या संवेदनाक्षम दृष्टीला, सृष्टीपेक्षा मानवी मनाचें सौंदर्य अपार व अथांग आहे असेंच आढळून येईल. परंतु मंगेश पाडगांवकरांची प्रतिभा निसर्ग-सौंदर्यांत अधिक रमते असें दिसतें. निसर्गाशी त्यांचा सहज हृदयसंवाद घडून येतो. त्यांचें सौंदर्य–पिपासू मन बदलत्या सृष्टींतील सौंदर्याचा प्रत्येक क्षण नि कण मोठ्या प्रेमानें, चतुराईनें व हळुवारपणें टिपून घेतें, त्यांच्या चिंतनांत वेड्होषपणें रंगतें आणि अगदी तन्मयतेनें त्यांचीं चित्रें रेखाटतें. शब्दांतील अर्थ व लय यांच्या साह्यानें निर्माण केलेल्या रूपरसगंधाच्या, त्यांच्या प्रतिमा, जिवंत, बोलक्या व विलोभनीय असतात. दंवबिंदूंतील हळव्या स्पंदनाची धडधड, त्यांच्या जाणीवेला ऐकूं येते, लाटांतील गूढ इशारे ते शब्दांतून विणीत बसतात. लाजऱ्या येंवाच्या पावलाची चाहूल त्यांना ऐकूं येते आणि शब्दांतून भिर-भिरणारें गूढ शेवटी त्यांच्या हृदयींच्या मौनांत पहाट होऊन प्रगट होतें, आणि मग–

'रहस्य कळलें अंधाराला
कळलें नक्षत्रांशी नातें
अन् मी भेदुनि भूमीचा थर
रुजलों होऊनि हिरवें पातें '

अशी कवीला नवी जाणीव होते. अंधाराबरोबर कवी-लाहि नक्षत्राबरोबर असलेलें आपलें नातें कळतें. तो निसर्गाशी एकरूप होतो. भूमींतील हिरव्या पात्याबरोबर रुजतो, वाढतो आणि 'पहिल्या वहिल्या तृणपात्याचा आज असें सत्कार ' असें आनंदानें गाऊं लागतो.

कवि निसर्गाशी याप्रमाणें समरस होत असल्या-मुळें त्याची वाणीहि चित्रमयी होते. मग निसर्गाची रेखीव, सचेतन व मुखर शद्बप्रतिमा त्याच्या कवितेंत अवतरूं लागतात. शिशिरामधल्या उत्तर रात्रीं मनांत झुरणारें आकाश, दूर पळणाऱ्या वाटा, उन्हानें रेशिम भिजविणारी श्रावणाची रिमझिम, अबोल धुकें, आंधळा अंधार, लाजाळू येंव, पाण्याच्या आरशांत डोकावणारा शुभ्र ढगाचा गुलजार पिसारा, रातकिड्यांची एकतारी, दंवांत दडलेलें रत्नजडित गुपित, यांसारख्या पानोपानीं आढळणाऱ्या शद्बप्रतिमा आठवणींत राहतात आणि त्यांची रूपरसमाधुरी, सूर्यास्त झाल्यावरहि रेंगाळणाऱ्या संध्याप्रकाशाप्रमाणें मनाचें अवकाश उजळून टाकतात. निसर्ग–सौंदर्याच्या या प्रतिमा बघत असतांना ही गोष्ट मनाला प्रामुख्यानें जाणवते की पाडगांवकरांचें निसर्गा-वर निःसीम प्रेम आहे. ते निसर्गाचे सहचर आहेत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'पाचूची लकेर कुरणाच्या ओठीं
प्रकाशाचा गर्भ जळवंती – पोटीं
अखंड नूतन मला ही धरित्री
आनंदयात्री मी आनंदयात्री'

निसर्ग–सौंदर्याचीं त्रुटित भावचित्रें म्हणून पाडगांवकरांच्या शद्बप्रतिमा मोठ्या मनोहर आहेत. परंतु या प्रतिमांच्या द्वारें प्रगट झालेल्या भावानुभूतींचा विचार करतांना थोडी निराशा पदरीं येते. त्यांत पृथगात्मता प्रत्ययास येत नाही. तेंच बालकवींनीं निर्माण केलेलीं निसर्गचित्रें पहा. खचलेली भिंत, कलथलेला खांब, खिन्न एकांतगीत गाणारा पारवा, या सर्व प्रतिमांतून एक आर्तगान वाहात येतें. दुःखनिद्रेंत निद्रिस्त वृद्धराजाचें करुण गीत, त्या पडक्या पडशाळेंतून, साऱ्या जगांतून भरूं लागतें. आणि त्यांतील वृद्धाची करुणा आभाळाला व्यापून उरते. जळांत पाय टाकून बसलेल्या औदुंबराची विरक्ति नकळत मनांत निर्वेद निर्माण करते. आणि त्यामुळें शेजारीं फुललेल्या गुलाबाचा रंग देखील भगवा भासतो. हें सामर्थ्य व ही पृथगात्मता पाडगांवकरांच्या प्रतिमांत आढळत नाही. अनुभूतीची ही उत्तुंगता, व उत्कटता प्रत्ययास येत नाही. उलट त्यांच्या विविध निसर्ग–प्रतिमांतून भावानुभूतीचा तोचतोपणा अनेकदा जाणवतो आणि कांहीं वेळां ती अनुभूति अस्पष्ट व भोंगळ वाटते.

पाडगांवकरांनी स्वतः आपल्या काव्यांतील प्रतिमासृष्टीची चर्चा केली आहे. 'माझ्या काव्याची भूमिका' या आपल्या रेडिओ–भाषणांत ते म्हणतात 'मीं माझ्या कवितेंतून सहसा निसर्ग चितारीत नाही. व्यक्त होऊं पाहणारा माझा अनुभव निसर्ग – प्रतिमांचा आधार घेत असतो. कवितेंतल्या निसर्ग–प्रतिमांचा परिणाम 'मूड' निर्माण करण्यांत व्हावा अशी माझी इच्छा असते.' अगदी बरोबर. परंतु काव्यांत व्यक्त होणारा जो अनुभव आहे, त्याच्या स्वरूपाची मात्र चर्चा त्यांनीं समग्र केली नाहीं. काव्यांतला हा अनुभव विविध, विशाल व पृथगात्म असावा, हें कोणीहि कलावंत मान्य करील. नाहींतर त्या कलाकृतीचें स्वरूप एकेरी, एकसारखें पुनरुक्तिपूर्ण व निराशय होतें. पाडगांवकरांच्या पुष्कळशा कवितांची हीच स्थिति झालेली आहे. अनेक ठिकाणीं त्याच त्याच प्रतिमांची पुनरावृत्ति झाली आहे. निळा गौरव, निळा आशीर्वाद, सजल हेतु, सजल इशारे, कौलारांचीं कुलीन घरें, जाई जुईचें कुलीन वैभव, ह्या कल्पना अनेकवेळीं आल्या आहेत आणि प्राण तर पानांपानांतून उमलले आहेत. 'प्राणांत उमलतें नातें' 'नवा उमलता प्राण होऊनी', अशीं उदाहरणें वरींच दाखविता येतील.

निसर्गातील ललित कोमल हळुवार दृष्यांचेंच पाडगांवकरांना आकर्षण आहे, असें दिसतें. भव्य उत्तुंग, भयानक, प्रबल व प्रचंड निसर्गदृष्यें त्यांच्या कवितेंत आढळत नाहीत. पिवळ्या जर्द भयंकर जहरी सापाच्या दर्शनाने D. H. Lawrence च्या मनांत जो भावानुभव जागृत झाला, त्याचें सौंदर्यहि कांहीं कमी नाही. अशाप्रकारच्या विविध अनुभूतींचा प्रत्यय पाडगांवकरांच्या काव्यांतून प्रगट होत नसल्यामुळें, त्यांच्या 'मूड'चा तोचतोपणा फार जाणवतो,

पाडगांवकरांनी अंगिकारलेल्या अभिव्यक्तीच्या माध्यमाचाहि कदाचित् हा परिणाम असावा. यासंबंधी पाडगांवकर आपल्या उपरोक्त भाषणांत एके ठिकाणी म्हणतात 'निसर्गाच्या प्रतिमा अभावितपणें आणि अपरिहार्यपणें माझ्या अनुभूतीचें माध्यम बनतात. खरेंहि असेल तें. पण त्याचा परिणाम काय होतो हा मुख्य प्रश्न आहे. प्रत्येक ठिकाणीं हें माध्यम भावानुभूतीच्या उत्कट अभिव्यक्तीला समर्थ व सहाय्यक ठरतेंच असें नाही. प्रत्येक अनुभव हा आपला स्वतंत्र आकार बरोबर घेऊन येतो. त्याचा लय व न्यास अगदी वेगळा असतो. असें असतांना अभिव्यक्तीच्या एका विशिष्ट माध्यमांतच त्याला जखडून टाकल्यास, त्या अनुभूतीची सहजता, सुंदरता व व्यक्तित्वच नष्ट होतें.

निसर्ग–प्रतिमांच्या हव्यासानें पाडगांवकरांचीं चांगलीं प्रेमगीतें परिणामहीन झालीं आहेत असें वाटतें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आकाश, धुकें, नक्षत्रें यांच्या प्रतिमांच्या माध्यमांतून जेथें प्रणयी जिवांचे हृद्भाव प्रगट करण्याचा प्रयत्न केला आहे तेथे ते प्रेमी अशरीरी झाल्याचा भास होतो आणि देहाशिवाय जगणाऱ्या या प्रेमिकांच्या प्रणयांत, हालचालींत, रक्ताची ऊब नाही, स्पर्शाचा उन्माद नाही, असें वाटतें. या भावानुभूतींचें वर्णन करतांना कवीचे शब्द कसे प्रणयोत्सुक शरीराच्या स्पर्शाप्रमाणें मांसल व ऊबदार बनले पाहिजेत. असें घडलें नाही तर, त्रुटित निसर्गचित्रें तेवढीं प्रतीत होतात; परंतु त्यामागील भावानुभव हृदयाची पकड घेत नाही, निसर्गाच्या दर्शनानें अथवा चिंतनानें निर्माण होणारी भावानुभूति आणि निसर्ग – प्रतिमांच्या माध्यमांतून प्रगट होणारी भावाभिव्यक्ति यांची अपरिहार्यता मान्य करून चालल्यामुळेंच पाडगांवकरांच्या भावानुभूतीला मर्यादा पडल्या आहेत. त्यांच्या अनेक कवितांतून एकच एक मूड प्रगट होतो, त्याचें हेंहि एक कारण असू शकेल. स्वत: त्यांनींच म्हटल्याप्रमाणें, घरांतले आंकडे वेगवेगळे असले आणि निरनिराळ्या कोणानें व पद्धतीनें मिळवणी केली, तरी शेवटी एकच बेरीज दाखवणाऱ्या विशिष्ट चौकोणासारखी त्यांच्या बऱ्याच कवितांची स्थिति झाली आहे.

पाडगांवकरांच्या काव्याचा विचार करतांना, अमेरिकन कवयित्री एमीली डिकिन्सन यांच्या उद्गाराची मला आठवण होते. ती म्हणते " In the name of the Breeze. The Butterfly and The Bee, I believe in Them. " मर्यादित अर्थानें हे उद्गार सुंदर आहेत. एमिली डिकिन्सनची निसर्गावरील ही श्रद्धाच केव्हां केव्हां पाडगांवकरांच्या काव्यांतून प्रतीत होते. निसर्गावर अपरंपार प्रेम करावं, पण तें प्रेम Trinity of God, The Holy Ghost, The Christ and The Virgin Mary या देवतात्रयीवर प्रेम करणाऱ्या पाद्र्याप्रमाणें, एककल्ली कडवें असूं नये. निसर्ग-सौंदर्याचें चिंतन व त्याची अभिव्यक्ति हा कवीचा सहजधर्म व्हावा, परंतु तो त्याचा धर्म बनू नये, असा इषारा येथें देऊन ठेवावासा वाटतो.

कवीने निर्माण केलेली निसर्गसौंदर्याची शब्दप्रतिमा ही निसर्गाचें चित्र असते कीं कलावंताच्या मनाचें चित्र असते किंवा या दोन्हीहून वेगळी तिसरीच कलावस्तु ती असते, याचीहि चर्चा येथें करणें इष्ट झालें असतें. परंतु या लेखानें आपली पृष्ठमर्यादा आधीच ओलांडली आहे. म्हणून ही चर्चा एका स्वतंत्र लेखासाठींच राखणें योग्य वाटतें.

पाडगांवकरांच्या मर्यादा लक्षांत घेऊनहि हें मान्य करायला कोणालाहि अभिमान व आनंद वाटेल की ते एक सामर्थ्यशाली कवि आहेत. असामान्य भाषाप्रभुत्व व कल्पनासामर्थ्य यांच्या बळावर हा आनंदयात्री आपलें आगळें विश्व शोधण्यासाठी उत्साहानें वाटचाल करीत आहे. त्याला त्याचें विश्व सांपडेलहि, परंतु आज तो धुक्याच्या पुलावर येऊन थांबला आहे. रफू केलेल्या भावना मिरवण्याचा आणि विकल शब्दांत नवीन कळा ओवण्याचा त्याला कंटाळा आला आहे. त्या पुलावरून त्याला दिसत आहे–

'तुझ्या माझ्यामध्यें आहे
नवा धुक्याचा हा पूल
चाले ज्यावर धूसर
अनोळखी ही चाहूल
जाणवतें तुला मला
भासांत या सत्य नवें
खिडकीच्या भिजलेल्या
कांचेंतून जसे दिवे '

या पुलावरील अनोळखी हालचाली आणि भिजलेल्या कांचेंतून दिसणाऱ्या दिव्याप्रमाणे भासमान होणारें सत्य, त्यांच्या पुढील कवितांतून प्रत्यक्ष अवतरेल अशी मोठी आशा त्यांच्या जिप्सीनें आमच्या मनांत निर्माण केली आहे, हें निश्चित.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सं घ वा र्ता

विदर्भ साहित्यसंघ, परीक्षा समिति

आगामी परीक्षांच्या तारखा

संघाच्या आगामी परीक्षा शनिवार-रविवार दि. २१-२२ ऑगस्ट ५४ रोजी होतील. विद्यार्थ्यांनी माहितीपत्र आणि आवेदनपत्र इत्यादींची मागणी, डाक व्यय पाठवून कार्यालयांत करावी. नव्या केंद्राकरितां पत्रव्यवहार करावयाचा झाल्यास तो १ जुलै पूर्वीच व्हावा.

साहित्यपारंगत ही परीक्षा यापलिकडे केवळ जानेवारींतच होईल. त्या परीक्षेच्या व साहित्याचार्य प्रबंध परीक्षेच्या माहितीकरितां गरजूंनी वेगळा पत्रव्यवहार करावा.

माणिक के. बैतुले
कार्यवाह, परीक्षा समिति

सांस्कृतिक कार्यक्रम समिति

(१) **काव्य कुसुमांजलि.**

वि. सा. मंदिराच्या उद्‌घाटन प्रसंगाचा मुहूर्त साधून दिवंगत कवींना श्रद्धांजलि अर्पण करण्याचा एक अभिनव कार्यक्रम दि. २७ एप्रील ५४ रोजीं रात्रीं करण्यांत आला. या प्रसंगीं केशवसुतांपासून सुरू झालेल्या नवयुगांतील दिवंगत मानकऱ्यांचा परिचय व त्यांच्या काव्यवाचनाच्या रूपाने त्यांना श्रद्धांजलि अर्पण करण्यांत आली. कवि परिचय डॉ. मा. गो. देशमुख यांनी करून दिला. व काव्यवाचन केशवसुत-डॉ. कोलते, टिळक-नाना जोग, गडकरी-मा. नि. गलगलीकर, तांबे-म. शं. कानेटकर, बालकवि-कुसुम मोहनी, विनायक-शरच्चंद्र मुक्तिबोध, गोविंद- पु. भा. भावे, बी-वा. रा. कांत, बुवा उपाध्ये-ल. वा. तेलंग, अण्णाजी बोबडे-मा. कृ. पारधी, माधव जुलियन-या. मु पाठक, लक्ष्मीबाई टिळक-कुसुम मोहनी व बहिणाबाई चौधरी-सुधा मोडक या क्रमाने करण्यांत आलें.

(२) **कौमुदी.** वि. सा. संघाच्या कार्यक्षेत्रांत वावरणाऱ्या साहित्यिकांना परस्पर विचारविनिमयासाठी व वाङ्मयीन चर्चेकरितां सुप्रतिष्ठित व सुटसुटित व्यासपीठ लाभावें म्हणून दर महिन्यांतील शुक्ल पक्षांतील एका रात्रीं साहित्य-कलाविषयक 'कौमुदी' या अभिनव कार्यक्रमाचा उपक्रम सुरू करण्यांत आला आहे. उद्‌घाटनाचा कार्यक्रम दि. १६ मे ५४ रोजीं रात्रीं वि. सा. मंदिराच्या चंद्रशाळेंत पार पडला. आमंत्रकांनी कार्यक्रमाचा परिचय करून दिल्यावर श्री. प्रभाकर माचवे यांनी इतर भाषिकांच्या अशा प्रकारच्या कार्यक्रमांची ओळख करून दिली. व सुमारें तासभर त्यांनी चिदंबरम् लेखक परिषदेचें बहारदार वृत्त निवेदन केलें. नंतर श्री. या.मु. पाठक यांचें 'माझ्या कांही कवितांची जन्मकथा' या विषयावर भाषण झालें. श्री. वा. कृ. भावे यांनी बालकवींची एक आठवण सांगितल्यावर हा कार्यक्रम संपला.

केशव केळकर
आमंत्रक, सां. का. समिति.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अमरावती शाखा-वृत्त

कार्यकारी मंडळाची निवडणूक.

विदर्भ साहित्य संघाच्या अमरावती शाखेची वार्षिक सर्वसाधारण सभा ता. ९ मे रोजीं प्रा. ग., त्र्यं. देशपांडे यांचे अध्यक्षतेखालीं झाली.

प्रारंभी चिटणीस श्री. म. वा. देवघरे यांनी अहवाल व कोषाध्यक्ष श्री. ना. क. तांबी ह्यांनी गत-वर्षीचा हिशेब सभागृहाला सादर केला. सभेने अहवाल-हिशेबाला एकमतानें मंजूरी दिल्यावर पुढील कामका-जास सुरुवात झाली.

सन १९५४-५५ या वर्षासाठीं पुढीलप्रमाणें नवे पदाधिकारी अविरोधपणें निवडण्यांत आले.

अध्यक्षः कविभूषण व. ग. ऊर्फ अण्णासाहेब खापर्डे.

उपाध्यक्षः १. श्री. श्री. स. पंढरकर.
२. प्रा. पेशकार

चिटणीसः १. श्री. वल्लभदास गुप्ता.

सहचिटणीसः १. श्री प्र. बा. सोहळे,
२. श्री. वि्ह. शिवराम.

सभासदः श्री. निमदेव, श्री. बनसोड, श्री. आपटे,
श्री. बाबूराव मुळे, श्री. मो. रा. फुनसे,
कु. इन्दुमती मोटे, सौ. इन्दुमती देशमुख,
व प्रा. मा. ल. व्यवहारे.

पदाधिकाऱ्यांच्या निवडीनंतर प्रा. भ. श्री. पंडित यांनी आभार प्रदर्शित केल्यावर सभेचें काम संपलें.

म. बा. देवघरे
चिटणीस.

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे उद्देश आणि गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण करणें व नाट्यगृह बांधणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने दुर्मिळ ऐतिहासिक, शैक्षणिक व वाङ्मयीन ग्रंथांचें प्रकाशन.

५. मराठी भाषेच्या हिताचें प्रतिनिधिक स्वरूपाचें कार्य करणें,

मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने विदर्भ साहित्य संघाला मदत करावी अशी नम्र विनंती आहे.

'युगवाणी' सदस्यांना विनामूल्य. ★ सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

हें मासिक श्री. कुंडलराय मोहेकर यांनी अशोक, मुद्रणालय, धर्मपेठ, नागपूर येथे मुद्रित केलें व श्री. ह. ना. नेने, अध्यक्ष, वि. सा. संघ, यांनी संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर येथे प्रकाशित केलें.
२९-५-५४

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ

१९५३–५४ सालचें कार्यवृत्त

विदर्भ साहित्य संघाचें १९५३–५४ सालचें कार्यवृत्त आज या वार्षिक साधारण सभेला सादर करतांना आम्हाला आनंद होत आहे. वि. सा. संघाची कार्यव्याप्ति आता केवळ मध्यप्रदेशांतील मराठीभाषी जनतेइतपतच राहिली नसून, ती दिवसेंदिवस अधिक विस्तृत होत आहे व साहित्यसेवेबरोबर आपल्या उच्च ध्येयाप्रमाणे भाषा, संस्कृति आणि शिक्षण यांची अभिवृद्धिहि अधिकाधिक घडविली जात आहे हें जसें आम्हाला आनंदाचें एक कारण आहे, तसेंच आता अनेक अडचणींना तोंड देऊन आपल्या हक्काच्या उभारल्या गेलेल्या प्रशस्त मंदिराच्या स्थळीं आजची ही वार्षिक सभा भरली आहे हें एक दुसरें विशेष आनंदाचें कारण आहे.

विदर्भ साहित्य संघाचें १५ वें अधिवेशन राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या गुरुकुंज – मोझरी येथे दि. १३, १४ व १५ मार्च १९५३ रोजीं भरलें होतें. त्या अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. शं. दा. पेंडसे यांनी दि. ५. ४. १९५४ रोजीं केन्द्रीय कार्यालयांत घटनेप्रमाणे भरलेल्या जुन्या व नव्या कार्यकारी मंडळाच्या संयुक्त सभेंत, नवीन संघाध्यक्ष प्रा. भ. श्री. पंडित यांना अधिकार प्रदान केले.

सदस्य–संख्या

या वर्षी वि. सा संघाची सदस्य संख्या एकूण ११३८ आहे. त्यांत उपकारकर्ते ३, आश्रयदाते ९, सहाय्यक २, हितचिंतक १ आणि आजीव सदस्य १०५ असून, साधारण सभासद १०१८ आहेत.

वि. सा. संघाचें संमेलन

वि. सा. संघाचें संमेलन – अधिवेशन १६ वें प्रा. भ. श्री. पंडित यांचे अध्यक्षतेखाली दि. २५, २६ व २७ डिसेंबर १९५३ रोजीं खामगाव येथे न्यू ईरा हायस्कूलच्या भव्य पटांगणांत भरलें. पूर्ण यशस्वी झालेल्या या संमेलनाचें वृत्त 'युगवाणी'च्या फेब्रुवारी ५४ च्या अंकांत व संपूर्ण अध्यक्षीय भाषण जानेवारी ५४ च्या अंकांत प्रसिद्ध झालेंच आहे.

कार्यकारी मंडळ आणि साधारण सभा

या वर्षी कार्यकारी मंडळाने विविध प्रकारचीं भरीव कामें केलीं असून, संस्थेला स्थैर्य प्राप्त होण्याबाबत आटोकाट प्रयत्न केले आहेत. कार्यकारी मंडळाच्या पाच सभा भरल्या. त्या सभांच्या कामकाजाचें वृत्त 'युगवाणी'तून वेळोवेळीं प्रसिद्ध झालें आहे. मागील वार्षिक साधारण सभा दि. २६. ४. ५३ रोजीं भरली होती. दुसरी साधारण सभा संमेलनाचे प्रसंगीं खामगाव येथे दि. २५. १२. ५३ रोजीं भरली. या दोन्ही महत्त्वपूर्ण सभांचें वृत्तहि 'युगवाणी'तून प्रसिद्ध झालेंच आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघाची आर्थिक स्थिति

वि. सा. संघाच्या आर्थिक स्थितिसंबंधी सोबत जोडलेल्या जमाखर्चाच्या हिशेबाच्या तक्त्यावरून यथार्थ कल्पना येईलच.

वि. सा. संघाचें मुखपत्र म्हणून 'युगवाणी' मासिक, शैक्षणिक प्रगति व्हावी व मराठी भाषेचें ज्ञान लाभावें म्हणून होणाऱ्या परीक्षा, विविध सांस्कृतिक कार्यक्रम, ग्रंथसंपादन आदि बाबतींत वि. सा. संघ जागरूकतेने अधिक लक्ष घालून, या गोष्टींवर अधिक रक्कम कामीं आणतो व लोकसेवा साधण्याचा प्रयत्न करतो. या उपयुक्त कामासाठी या वर्षाला साधारणत: दहा हजारांचे वर खर्च झाला असून, येत्या वर्षी याहिपेक्षा अधिक खर्च होईल, असें १९५४–५५ सालच्या अंदाजपत्रकावरून दिसून येईल. मध्यप्रदेश शासनाकडून आतापर्यंत वर्षाला ५००० रु. चें अनुदान दिलें गेलें, तें उपरिनिर्दिष्ट कामासाठीच खर्च झालें आहे, हें येथे नमूद करणें आवश्यक आहे. येत्या वर्षाला मध्यप्रदेश शासनाकडून ७५०० रु. चें अनुदान लाभणार असून, तें अनुदान भाषा, साहित्य, संस्कृति, संशोधन इ. कामासाठी खर्च केलें जाईल, अशी आशा आहे. मध्यप्रदेश शासनाने अनुदान वाढविण्याचें हें जें औदार्य दाखविलें त्याबद्दल त्याचे मन:पूर्वक आभार मानणें आमचें कर्तव्य आहे.

'युगवाणी' मासिक व संपादक मंडळाचें कार्य.

यंदा श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांच्या संपादकत्वाखाली प्रसिद्ध झालेल्या 'युगवाणी' मासिकाने प्रांतांतील बरेच उदयोन्मुख कवि, लघुकथालेखक व समीक्षक यांना प्रोत्साहन दिलें आहे. पूर्वी युगवाणी महिन्याच्या साधारण १५–२० तारखांच्या दरम्यान प्रसिद्ध होत असे. परंतु अंक पहिल्या तारखेला प्रसिद्ध होणें इष्ट व सोयीचें आहे, असें ठरून त्याप्रमाणे प्रत्येक अंक पहिल्या तारखेला सभासदांच्या हातीं पडावा, याची शक्य ती दखल घेण्यांत आली. तारखांत जो बदल करण्यांत आला त्यामुळे मे–जून १९५३ चा जोड अंक निघून एका अंकाची उणीव दिसत असली तरी दुसऱ्या अंकाला अधिक पृष्ठें देऊन ती उणीव दूर करण्यांत आली आहे. या वर्षी एकूण अकरा अंक प्रसिद्ध झाले असून, दिवाळी विशेषांक व संमेलन विशेषांक म्हणून प्रसिद्ध झाले आहेत. हे दोन्ही विशेषांक उच्च प्रकारच्या भरगच्च साहित्याने सजविण्यांत आले होते. ३२ पृष्ठांच्या 'युगवाणी'त अधिकाधिक मजकूर प्रसिद्ध व्हावा म्हणून मासिकाचा आकार बदलविण्यांत आला व सलग एकच मोठा स्तंभ न ठेवतां दोन स्तंभांत मजकूर देण्याची व्यवस्थाहि करण्यांत आली. 'युगवाणी'त इष्ट त्या सुधारणा घडवून आणणें व उत्कृष्ट साहित्याने अंक नटविणें या बाबतींत श्री. ह. ना. नेने, प्रा. के. ज. पुरोहित, श्री. गो. रा. दोडके व तसेंच श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध, प्रा. अ. ना. देशपांडे, श्री. त्रि. गो. देशमुख, श्री. म. बा. देवघरे, सौ. उषाताई कोलते व सौ. इंदुताई शेवडे या संपादक मंडळावरील सदस्यांनी श्रम घेतले आहेत. 'युगवाणी'च्या कार्यालयीन व्यवस्थेच्या बाबतींत श्री. ह. ना. नेने, प्रा. के. ज. पुरोहित व श्री. गो. रा. दोडके यांनी विशेष लक्ष घातलें, याचा उल्लेख करणें अवश्य आहे. तद्वत्‌च नारायण मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. पां. ना. वनहट्टी यांनी अंक वेळेवर व सुबक काढून देण्यास सहकार्य दिलें आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परीक्षा–समितीचें महत्त्वपूर्ण कार्य

परीक्षा–समितीचें या वर्षाचें कार्य महत्त्वपूर्ण व प्रशंसनीय झालें आहे. या समितीने अगदी पद्धतशीर रीतीने व मोठ्या दक्षतेने आपली जबाबदारी पार पाडली. मागील वर्षाच्या मानाने, या वर्षी कार्य अडीच पटीनें वाढलें असून, प्रांत-भर कार्याची व्याप्ति वाढविण्याचा हिरीरीने प्रयत्न करण्यांत आला आहे. वि. सा. संघाच्या परीक्षांद्वारें मराठी भाषेबद्दल आस्था व प्रेम अधिकाधिक वाढवून परीक्षा–समितीने जे कष्ट घेतले त्यांची कोण प्रशंसा करणार नाही ? वर्षांतून दोनदा होणाऱ्या परीक्षांपैकी ऑगस्ट १९५३ मधील परीक्षांसाठी प्रदेशांत एकूण २६ केन्द्रें होतीं व ५५० परीक्षार्थी होते, तर जानेवारी १९५४ मधील परीक्षांसाठी एकूण ३९ केन्द्रें होतीं व ११३३ परीक्षार्थी होते. या परीक्षांचा निकाल, केन्द्रें, केन्द्रा-धिकारी व परीक्षक यांच्या माहितीच्या तक्त्यासह मार्च १९५४ च्या 'युगवाणी'च्या अंकांत जें सविस्तर वृत्त प्रसिद्ध झालें आहे त्यावरून समितीच्या यशाचें मोल सहज कळून येईल. परीक्षा समितीचे संचालक प्रा. पां. कृ. सावळापूरकर व कार्य-वाह श्री. माणिक के. बैतुले यांनी घेतलेले परिश्रम, तसेंच समितीतील डॉ. वि. भि. कोलते, डॉ. मा. गो. देशमुख, सौ. उषाताई कोलते, श्री. द. शं. फडके व श्री. ना. ग. डवीर या सदस्यांचे सहकार्य याचा अभिमानपूर्वक उल्लेख करणें भाग आहे. जानेवारी १९५४ मधील ३१ केन्द्राशिवाय आणि १६ केन्द्रें संकल्पित आहेत, ही समाधानाची गोष्ट आहे.

या वर्षी साहित्यविनीत या परिक्षेंत प्रथम श्रेणींत सर्वप्रथम आल्याबद्दल या सत्राचें कै. ना. कृ. दिवाणजी पारितोषिक भंडारा येथील कु. सुधा व्यवहारे या विद्यार्थिनीला देण्याचें घोषित करण्यांत आलें आहे.

'साहित्यपारंगत' या परिक्षेंत प्रथम श्रेणींत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास दरवर्षी पारितोषिक देतां यावें म्हणून, डॉ. वा. ग. शिंगणापूरकर यांनी वि. सा. संघाला ५०० रुपयांची देणगी दिली आहे. योजनेप्रमाणे या रकमेच्या व्याजांतून दिलें जाणारें पारितोषिक येत्या वर्षापासून अमलांत आणलें जाईल. डॉ. वा. ग. शिंगणापूरकर यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ही जी देणगी दिली आहे त्याबद्दल ते धन्यवादास पात्र आहेत.

सांस्कृतिक कार्यक्रम समितीचें यश

सांस्कृतिक व बौद्धिक कार्यक्रमांमुळे हें वर्ष बरेंच गाजलें. कार्यक्रम समितीने अनेक विद्वान् साहित्यिकांचीं व नेत्यांचीं व्याख्यानें घडवून आणलीं. त्याचप्रमाणे सांस्कृतिक कार्यक्रम समितीने मागील वर्षाप्रमाणेच यंदाहि हिरीरीने प्रयत्न करून, तज्ज्ञ साहित्यिकांचे बहुमोल विचार असंख्य श्रोत्यांना ऐकविले. महाराष्ट्राचे ख्यात-मान कादंबरीकार श्री. वि. स. खांडेकर यांनीं ह. ना. आपटे, वा. म. जोशी, श्री. व्यं. केतकर, ना. सी. फडके व साने गुरुजी या पांच अग्रगण्य कादंबरीकारांच्या कादंबऱ्यांचा आपला व्यासंगपूर्ण वाणीनें परामर्श घेऊन श्रोत्यांना अक्षरशः डोलविलें. तिकीट–विक्रीने व्याख्यानें घडवून आणण्याचा जो पायंडा वि. सा. संघाने मागील वर्षी घातला तो रूढ होत असल्याचा व कमालीचें यश प्राप्त होत अस-ल्याचा प्रत्यय श्रोत्यांच्या अलोट गर्दीवरून या वर्षीहि आला. सांस्कृतिक कार्यक्रम

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

समितीचे आमंत्रक श्री. रा. पु. सगदेव व त्यांचे सहकारी प्रा. वा. कृ. चोरघडे, प्रा. श्री. वि. गंधे, श्री. र. वि. कुळकर्णी व श्री. पां. वा. गडकरी; तसेंच कार्यक्रम समितीचे आमंत्रक श्री. नानासाहेब जोग, श्री. केशव केळकर, प्रा. के. ज. पुरोहित, श्री. ह. ना. नेने, श्री. त्रि. गो. देशमुख, प्रा. श्री. वि गंधे व श्री. मनोहरपंत जुनघरे या सर्व सदस्यांचे आभार मानणें अवश्य आहे.

थोर नेते व साहित्यिक यांच्या भेटी व भाषणें

या वर्षी देखील अनेक थोर नेत्यांनी व साहित्यिकांनी वि. सा. संघाला भेट दिल्या व होत असलेल्या कार्याचा अभिमानपूर्वक उल्लेख केला. तसेंच त्यांची विविध विषयावर विचारपरिप्लुत भाषणेंहि झालीं. सुविख्यात अर्थशास्त्रज्ञ व घटनातज्ज्ञ प्रा. धनंजयराव गाडगीळ, सुप्रसिद्ध कादंबरीकार श्री. वि. स. खांडेकर, क्रांतिकारक श्री. रामलाल वाजपेयी, सांस्कृतिक स्वातंत्र्य परिषदेच्या भारतीय समितीचे चिटणीस व एक विचारवंत साहित्यिक श्री. प्रभाकर पाध्ये, कम्युनिस्ट पक्षाचे प्रख्यात पुढारी श्री. श्री. अ. डांगे, मुंबईचे शेतकरी – कामकरी पक्षाचे चिटणीस श्री. रघुनाथराव खाडिलकर, ह. भ. प. प्रा. सोनोपंत दांडेकर, ख्यातनाम नाटककार श्री. भा. वि. ऊर्फ मामासाहेब वरेरकर, भारतीय षड्दर्शनाचे दीर्घ व्यासंगी पं. बाळकृष्णशास्त्री खुपेरकर, जळगावचे प्रसिद्ध टीकाकार प्रा. म. ना. अदवंत, प्रख्यात हिंदी साहित्यिक डॉ. मुल्कराज आनंद, मुंबईचे सुविख्यात साहित्यिक व टीकाकार प्रा. न. र. फाटक, मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष श्री. पगडी, हिंदीचे ख्यातनाम साहित्यिक व तत्वज्ञ श्री. जैनेन्द्रकुमार, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष व विख्यात भाषापंडित प्रा. कृ. पां. कुळकर्णी, सुप्रसिद्ध लघुकथालेखक प्रा. गंगाधर गाडगीळ, श्रीमती बकुळाबाई अभ्यंकर; तसेंच मध्यप्रदेशाचे अर्थमंत्री व हिंदी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. ब्रिजलाल बियाणी, अन्नमंत्री श्री. दीनदयाल गुप्त, स्वास्थ्यमंत्री श्री. मा. सा. कन्नमवार, राजस्व उपमंत्री श्री. वसंतराव नाईक, विदर्भ प्र. कॉं. कमिटीचे अध्यक्ष आणि संसदेचे सदस्य डॉ. खेडकर, श्री. ताहेरअली, कविभूषण अण्णासाहेब खापर्डे यांचा प्रामुख्याने साभार उल्लेख करणें आवश्यक आहे.

तद्वत्‌च, महाराष्ट्राचे लोकप्रिय कवि श्री. राजा बढे यांचे सुश्राव्य काव्यगायन, मुंबईचे एक प्रसिद्ध कलाकार श्री. दीनानाथ टाकळकर यांचे साभिनय नाट्यप्रयोग. व कोजागिरी साजरी करतांना स्थानिक कलाकारांचें गायन, नृत्य व वादन इत्यादि विविध कार्यक्रम घडविण्यांत आले.

गडकरीस्मारक समिति व तिचीं भरीव विविध कामें

गडकरीस्मारक समितीनें यंदा हातीं घेतलेली कामें वाखाणण्याजोगीं झालीं. या समितीनें अधिकाधिक निधि गोळा करण्याचा कसोशीनें प्रयत्न केला व गडकरीस्मारकाचें भव्य दालन पूर्णत्वाला आणण्यास मदत केली. यंदाचा गडकरी-स्मृतिदिन अमरावतीचे कविभूषण अण्णासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला. तसेंच नटनाट्य दर्शन, पुणे या नाटक कंपनीचा 'पुण्य – प्रभाव' या नाटकाचा प्रयोग घेऊन, उत्पन्नांत भर टाकण्यांत आली. त्याच प्रमाणे, निबंधस्पर्धा, काव्यगायन, नाट्यप्रवेश वगैरे कार्यक्रम घडवून मनोरंजनाबरोबर

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाट्य व काव्य यांची गोडी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. गडकरीस्मारक कोणकोणत्या दृष्टींनी उभारलें जाईल याचा विचार करून, त्या योजना अमलांत आणण्याचा या समितीचा प्रयत्न स्तुत्य आहे. ग. स्मा. समितीच्या कार्याध्यक्ष कु. ताराबाई प्रधान व कार्यवाह श्री. पां. बा. गडकरी यांचे श्रम आणि समितीचे श्री. चंदुलाल मुळे, श्री. नानासाहेब ओगले, सौ. पद्मावतीबाई चिटणवीस, श्री. टी. आर्. ऊर्फ नानासाहेब नागले, सौ. उषाताई कोलते, श्री. रा. पु. मगदेव, श्री. र. वि. कुळकर्णी, प्रा. श्री. वि. गंधे व श्री. नी. सी. कारखानीस या सभासदांचे सहकार्य याचा गौरवपूर्ण उल्लेख न करणें कृतघ्नपणाचें होईल.

या समितीने नटनाट्य दर्शन, पुणे या नाटक मंडळीचा अगत्याने सत्कार केला, ही गोष्टहि येथे नमूद करणें अवश्य आहे.

प्रकाशन समिति व निविदा समिति

या वर्षी प्रकाशन समितीने सागरच्या श्रीमती मालतीबाई श्रीखंडे यांच्या हिंदी 'मराठी भाषा प्रवेशिका' या पुस्तकाचें प्रकाशन करून हिंदी भाषिकांना वि. सा. संघाच्या परिक्षेला बसण्याची व अभ्यास करण्याची सोय करून दिली आहे. हें पुस्तक श्रीमती मालतीबाई श्रीखंडे यांनी वि. सा. संघाला सर्व हक्क देऊन, कांही मोबदला न घेण्याचें जें औदार्य दाखवलें त्याचा कृतज्ञतेने येथे उल्लेख करणें व श्रीमती श्रीखंडे यांचें अंतःकरणपूर्व आभार मानणें कर्तव्यप्राप्त आहे. या कामीं डॉ. वि.भि. कोलते यांचें फार मोठें सहकार्य लाभलें असून, डॉ. मा. गो. देशमुख, श्री. ह. ना. नेने, प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, प्रा. वा. कृ. चोरघडे व श्री. गोपाल शर्मा यांनी केलेली मदत विशेष आहे. त्याचप्रमाणे निविदा समितीने देखील आपली जबाबदारी दक्षतेने पार पाडली आहे.

राजभाषा अधिनियम उपसमिति

राज भाषा अधिनियम उपसमितीने, मध्यप्रदेश राजभाषा अधिनियम २४, कलम ३व४ मध्ये सरकारने दुरुस्ती करावी व मराठीला हिंदीचा समान दर्जा द्यावा आणि सरकारी कचेऱ्यांतून मराठी विभागांत मराठी भाषेंतूनच तिचा वापर व्हावा म्हणून आटोकाट प्रयत्न केलेत. त्यासाठी सरकारशी बराच पत्रव्यवहार केला व मुख्य मंत्र्यांकडे शिष्टमंडळ नेऊन योग्य त्या वाटाघाटीहि केल्या. या बाबतचा या उपसमितीने आपला वृतान्त सविस्तरपणे वृत्तपत्रांतून तसेंच 'युगवाणी' एप्रिल ५४ च्या अंकांतूनहि प्रसिद्ध केला आहे. या समितीचे आमंत्रक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर व श्री. पु. य. देशपांडे श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे, श्री. ए. श्री. पटवर्धन प्रभृतींचे प्रयत्न अभिमानाचे आहेत.

घटनाविषयक प्रश्न समिति व संघशाखा घटना समिति

या वर्षी,घटनाविषयक प्रश्न समिति व संघशाखा घटना समिति नियुक्तकरण्यांत येऊन,घटनेंत योग्य त्या दुरुस्त्या करण्याचा प्रयत्न करण्यांत आला. त्यांच्या एकदोन बेठकीहि झाल्या. पण हें काम अतिशय जिकिरीचे व महत्वाचें असल्याने या वर्षाला दुरुस्तीचें काम पूर्ण होऊं शकलें नाही. या घटनाविषयक प्रश्न समितीने सभासदांकडून दुरुस्तीसंबंधी सूचनाहि मागविल्या होत्या. या सूचनांचा विचार चालू असून

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

येत्या वर्षांत हें कार्य पूर्ण होईल, अशी आशा आहे. या समितीचे अध्यक्ष न्या. मू. के. तु. मंगळमूर्ति, आमंत्रक श्री. द. रा. गोमकाळे व सभासद श्री. पु. य. देशपांडे; तसेंच संघशाखा घटना समितीचे आमंत्रक श्री. म. वा. देवघरे व सभासद श्री. ना. ग. डबीर, श्री. वसंत बाळाजी शट्टे व श्री. पु. य. देशपांडे यांचा अभिमानपूर्वक निर्देश केला पाहिजे.

मंदिररचना समिति व निधि समितीचें भरीव कार्य

विदर्भ साहित्य संघाची सर्वांत मोठी व अभिमानाची कामगिरी म्हणजे मंदिराची उभारणी होय. मंदिररचना समितीच्या श्रमाचे व मंदिरनिधि समितीच्या कष्टाचें मोल ठरवितां येणार नाहीं. आज हें जें भव्य मंदिर उभारलें गेलें आहे त्याचे सर्व श्रेय या दोन्ही समित्यांचे अध्यक्ष न्या. मू. के. तु. मंगळमूर्ति, आमंत्रक श्री. ग. त्र्यं माडखोलकर, श्री. नानासाहेब जोग, व श्री. ग. पु. सगदेव, श्री. बाबूराव चिमोटे, श्री. ना. गो. ओगले आणि सर्व सहृदय देणगीदारांनाच आहे यांत संदेह नाही. आम्ही आपली कृतज्ञता व्यक्त करतों. मार्गांत येणाऱ्या अनेक अडचणींना तोंड देऊन मंदिर उभारणीचें जें स्वप्न आज साकार झालें आहे, त्यासाठी सुमारें ७५ हजारांवेवर खर्च आला आहे. अडचणीच्या प्रसंगीं वि. सा. संघानें मंदिररचना समितीला परत करण्याच्या अटीवर, दि. १४. ९. ५२ च्या कार्यकारी मंडळाच्या ठरावाप्रमाणे व साधारण सभेच्या निर्णयाप्रमाणे, १० हजार रुपये वापरण्यास दिले गेले आहेत. तसेंच अगदी निकडीच्या वेळीं मंदिररचना-समितीने श्रीमंत पूर्णचन्द्रराव बुटी यांचेकडून ६ हजार रुपयांचें कर्ज घेतलें होतें; पण नंतर तें कर्ज समितीने फेडूनहि टाकलें आहे.

या वर्षी मध्यप्रदेश शासनाने मंदिराला २५ हजारांचें अनुदान दिलें आहे, याचा साभिमान उल्लेख करणें व त्यासाठी मध्यप्रदेश शासनाचे मनःपूर्वक आभार मानणें आमचें कर्तव्य आहे. कोणत्या विकट परिस्थितींतून हें हक्काचें मंदिर उभारलें गेलें आहे याची सर्व सभासदांना कल्पना आहेच. या मंदिरानंतर लगेच एका भव्य नाट्यगृहाचें काम हातीं घेतलें जाणार आहे. आपल्या प्रांतांत नाट्यगृहाची भासणारी मोठी उणीव वि. सा. संघ भरून काढण्याचा कसोशीने प्रयत्न करणार आहे. त्यासाठी सर्वांनी सक्रीय मदत करून वि. सा. संघाचा यशाचा दुसरा टप्पाहि पूर्णत्वाला नेण्याचे श्रेय घ्यावेत, अशी नम्र विनंती आहे.

[सोबत यंदाच्या मंदिराच्या खर्चाचा हिशेब स्वतंत्रपणे जोडला आहे.]

साहित्यसंस्था सहकार समिति

साहित्य संस्था सहकार समितीने यंदा स्थानिक अनेक संस्थांशी हितसंबंध जोडून, साहित्य, कला व शिक्षण या बाबतींत प्रकर्षाने विचारविनियम केला. या समितीच्या तीनचार बैठकीहि झाल्या व या बैठकींना विद्यालयें, शाळा व इतर कला व साहित्यसंवर्धक संस्था यांचे प्रमुख प्रतिनिधि उपस्थित राहून, त्यांनी उद्बोधक चर्चा केली. या साहित्यसंस्था सहकार समितीचे आमंत्रक प्रा. श्री. मा. कुळकर्णी व सभासद प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, डॉ. मा. गो. देशमुख, प्रा. ना. वि. करवेलकर, श्री. दि. व. पंडित व श्री. पु. व्यं. दारव्हेकर यांचे आम्ही आभारी आहोंत.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परिभाषा समिति, शुद्धलेखन समिति, सीमा समिती या सर्व समित्यांवरील सभासदांनी दिलेल्या सहकार्याबद्दलहि आम्ही आभारी आहोंत.

वि. सा. संघशाखा व संलग्नसंस्था

अमरावती, गोंदिया, भंडारा येथील संघशाखांनी आपापल्या विभागांत सभासद वाढविण्याचे, विविध कार्यक्रम घडविण्याचे व संघशक्ति वाढविण्याचे योग्य ते प्रयत्न केले आहेत. नागपूर सोडल्यास, भंडारा गोंदिया व अमरावती या प्रमाणांत जास्तीत जास्त सभासद वाढविण्याचें कार्य झालें आहे. गुरुकुंज मोझरी येथील 'श्री गुरुदेव प्रकाशन मंडळ' व येथील 'भारतीय भाषाध्ययन मंदिर' या दोन संस्था वि. सा. संघाच्या संलग्न संस्था असून, आता खामगाव येथे संघशाखा नुकतीच काढण्यांत आली आहे. या सर्व संघशाखांचे प्रयत्न स्तुत्य आहेत. त्यांच्या सहकार्याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोंत.

निवडणुकी

वि. सा. संघाच्या १९५४–५५ सालच्या निवडणुकी ६ मार्च १९५४ रोजीं होऊन, नवीन संघाध्यक्ष श्री. ह. ना. नेने यांच्या अध्यक्षतेखाली नवीन कार्यकारी मंडळ निवडून आलें. या निवडणुकीची जबाबदारी संघाध्यक्ष प्रा. भ. श्री. पंडित यांनी अतिशय दक्षतेने व बरेच श्रम घेऊन पार पाडली. या कामीं संघाध्यक्षांनी नियुक्त केलेल्या श्री. भाऊराव भोयर व श्री. शं. वा. फलटणकर या गणकांनी मतमोजणीचें व आपला निकाल अध्यक्षांना सादर करण्याचें कार्य फार जोखमीने व कांटेकोर पद्धतीने केले याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

त्याचप्रमाणे लवाद श्री. ए. श्री. पटवर्धन यांनी निवडणुकीबाबत आलेल्या तक्रारींची योग्य ती दखल घेऊन व निःपक्षपातीपणाने निकाल देऊन आपली जबाबदारी पार पाडली याबद्दल त्यांचेहि आम्ही मनःपूर्वक आभार मानतों.

कार्यकर्त्यांचे आभार

वि. सा. संघाचे हिशेब चोख ठेवण्याच्या बाबतींत व पद्धतशीर व्यवस्था राखण्याच्या बाबतींत कोषाध्यक्ष प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांचें आम्हाला मोलाचें सहकार्य लाभलें आहे. त्याचप्रमाणे संस्थेचे एक विश्वस्त न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ति, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. पु. य. देशपांडे श्री. बाळासाहेब ढवळे यांनी वेळोवेळीं केलेलें योग्य मार्गदर्शन आणि डॉ. वि. भि. कोलते, श्री. ह. ना. नेने, श्री. नानासाहेब जोग प्रा. के. ज. पुरोहित, श्री. रा. पु. सगदेव, प्रा. वा. कृ. चोरघडे, डॉ. मा. गो. देशमुख, श्री. केशव केळकर, श्री. पां. बा. गडकरी, कु. ताराबाई प्रधान, श्री. ए. श्री. पटवर्धन, सौ. उषाताई कोलते, प्रा. श्री. वि. गंधे, श्री. त्रि. गो. देशमुख, श्री. र. वि. कुळकर्णी, सौ. इंदुताई शेवडे, श्री. श. वा. रानडे, श्री. नानासाहेब ओगले, श्री. गो. रा. दोडके, श्री. चंदुलाल मुळे, श्री. भय्यासाहेब तेलंग, श्री. ना. हि. सोनडुले प्रभृति कार्यकर्त्यांनी सौजन्यपूर्ण दिलेल्या सहकार्याबद्दल आम्ही आपली कृतज्ञता व्यक्त करतों.

त्याचप्रमाणे अधिकृत हिशेब तपासनीस श्री. महेश्वरराव गद्रे व त्यांचे सहकारी श्री. चंद्रकांत कृष्णराव साठे यांनी हिशेबाच्या बाबतींत वेळोवेळीं योग्य

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ती सल्ला देऊन व वर्षाचे सर्व हिशेब मोठ्या दक्षतेने परिश्रमपूर्वक तपासून दिले याबद्दल आम्ही त्यांचे व हिशेबनीस श्री. द. कृ. गोडबोले यांचे विशेष आभारी आहोंत. संघलेखक श्री. स. ल. साखळे यांनी अतिशय प्रामाणिकपणे व जबाबदारीने वाटेल त्या प्रसंगीं सतत साथ देऊन जें सहकार्य केलें त्याचा आम्हाला अभिमान वाटतो. दुसरे संघलेखक श्री. ह. येगावकर यांचाहि निर्देश केला पाहिजे.

मंदिर बांधकामाच्या बाबतींत शिल्पज्ञ श्री. भाईसाहेब करजगावकर यांच्या सहकार्याचा विशेष उल्लेख करून, त्यांनी दिलेल्या सल्लामसलतीबद्दल त्यांना धन्यवाद देणें आमचें कर्तव्य आहे. तसेंच श्री. रावळे यांच्या कष्टांचा अभिमानपूर्वक उल्लेख करणेंहि अवश्य आहे.

क्षमायाचना व सहकार्याबद्दल विनंती

संक्षिप्त स्वरूपांत १९५३–५४ सालचें हें कार्यवृत्त सादर केलें आहे. कार्य करतांना आमच्याकडून कमीअधिक चुका घडण्याचा संभव आहे. त्याबद्दल आम्ही क्षमाप्रार्थी आहोंत.

आता या पवित्र मंदिरांत वि. सा. संघाचें कार्य अधिक व्यापक, अधिक भरदार व अधिक फलदायी करण्याच्या कामीं सर्वांनी सहकार्य द्यावें, अशी नम्र विनंती करून, आम्ही आपलें हें अल्पसें वार्षिक कार्यवृत्त संपवितों.

दिनांक
२५–४–१९५४

ना. रा. शेंडे
सरचिटणीस

इंदुमती गंधे
चिटणीस

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर [म. प्र.]

दिनांक १ एप्रिल १९५३ ते ३१ मार्च १९५४ पर्यंतचा

जमाखर्चाचा तक्ता

जमा

आरंभीची शिल्लक :		
नगदी जवळ	२५९–१०–४	
वँकेत	१८,३३८–१४–९	
मुदतीची ठेव	३,०००– ०–०	
		२१,५९८–९–१
वर्गणी		
साधारण सभासद	२,७७१–०–०	
आजीव सभासद	६२६–०–०	
		३,३९७–०–०
पाठ्य पुस्तक प्रतिलिपि अधिकार		४,१५०–०–०
परीक्षा शुल्क		३,९२०–६–०
किरकोळ जमा		४००–१५–०
मंदिर निधि	१७,६७७–१०–०	
गडकरी समिती देणग्या	३,९५२– ३–०	
		२१,६२९–१३–०
सरकारी मंदिरनिधी ग्रंट		२०,०००–०–०
सरकारी ग्रंट		५,०००–०–०
सांस्कृतिक समिति		१,३१२–७–६
पुस्तक विक्री		८१–४–०
ठेवीवरील व्याज		१३८–१३–३
लो. अणे. यांच्या तैलचित्रासाठी		५०– ०–०
श्री. ओगले हिशोब मिळाला		६००– ०–०
श्री. गडकरी हिशोब मिळाला		३३– ६–६
मागील वर्षाचा अॅडव्हान्स परत		१००– ०–०
सस्पेन्स (अकौंट)		१२०– ०–०
कर्जाऊं रक्कम घेतली		६,०००– ०–०
एकूण		८८,५३२–१०–४

खर्च

वेतन खर्च		२,७१५– २–०
टपाल व तार खर्च		३३९–१४–६
मुद्रण व स्टेशनरी		१,२१२–११–०
युगवाणी मुद्रण		३,९५५– ०–९
वाहन व प्रवास खर्च		९१५–१०–०
किरकोळ खर्च	२७८–१५–३	
वँक कमिशन	१२–१२–०	
अंशदान	१४७– ८–०	
कर्जावरील व्याज	७५– ०–०	
ऑडिट खर्च	१००– ०–०	
		६१४–३–३
सांस्कृतिक कार्यक्रम		७४९–१–९
आतिथ्य खर्च		१७१–०–६
वीज खर्च		३७५–४–६
मंदिररचना खर्च		५३,९७२–१२–३
वस्तु खरेदी		१,८८३–६–९
परिक्षा समिति		१,८२५–२–६
ग्रंथ संपादन खर्च		६७९–०–०
कार्यालयीन व्यवस्था		५८३–७–०
कर्जाऊं रक्कम परत केली		६,०००–०–०
अॅडव्हान्स (नारायण मुद्रणालय)		२१३–१५–९
वँक अंकौंट शिल्लक		
म. प्र. हा. सोसायटी	५,०००– ०–०	
म. प्र. को. वँक	७३–११–९	
महाराष्ट्र वँक करंट	२,७४३– ०–९	
महाराष्ट्र वँक विल्डींग	९९४–१२–६	
		८,८११–९–०
मुदतीची ठेव : मागील	३०००–०–०	
ह्या वर्षी	५००–०–०	
		३,५००–०–०
अखेर शिल्लक जवळ		१५–४–१०
एकूण		८८,५३२–१०–४

प्रमाणपत्र : वि. सा. संघ नागपूर या संस्थेच्या जमाखर्चाच्या तक्त्यांत वर दिलेले आंकडे, संघाच्या जमाखर्चाच्या पुस्तकाशीं तंतोतंत जुळतात आणि हीं पुस्तकें आम्ही तपासलीं असून तीं वरोवर आहेत असें प्रमाणपत्र आम्ही देतों.

नागपूर, दिनांक २१ एप्रिल १९५४.

(सही) **महेश्वर गद्रे** आणि कंपनी
अधिकृत हिशेवनीस

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

Receipts & Payments Statement for the Period from 1-4-1953 To 31-3-1954

Receipts

To, Opening Balance :-		
Cash in Hand	259-10-4	
At Bank.	18,338-14-9	
Fixed Deposits	3,000-0-0	
		21,598-9-1
To, Subscriptions :-		
Ord. Members	2, 771-0-0	
Life Members	626-0-0	
		3, 397-0-0
Receipts from Royalties.	4,150-0-0	
Examinations Fees.	3,920- 6-0	
Miscellaneous Receipts.	400-15-0	
Building Fund.	17,677-10-0	
Donations to Gadkari Samiti	3,952- 3-0	
		21,629-13-0
Govt. Grant to Building Fund.	20,000- 0-0	
Government Grant.	5,000- 0-0	
Sanskritic Samiti.	1,312- 7-6	
Sales of Books.	81- 4-0	
Interest on Deposits.	138-13-3	
Donations for Oil-Painting of Shri. Lo. Aney.	50- 0-0	
Account Recd. From Mr. Ogle.	600- 0-0	
Account Recd. from Mr. Gadkari	33- 6-6	
Advance Returned	100- 0-0	
Suspense Account.	120- 0-0	
Amount Taken On Loan	6,000- 0-0	
Total Rs.	88,532-10-4	

Payments

By, Salaries.	2,715- 2-0	
" Postage & Telegrams	339-14-6	
" Printing & Stationery.	1,212-11-0	
" Yugawani Publication.	3,955- 0-9	
" Travelling & Conveyance.	915-10-0	
" Miscellaneous Expenses.	278-15-3	
Bank, Comm.	12-12-0	
Branches' Share (Anshadan)	147- 8-0	
Interest on Loan	75- 0-0	
Audit Fees.	100- 0-0	
		614- 3-3
" Cultural Activities	749- 1-9	
" Entertainment Expenses.	171- 0-6	
" Electrical Charges	375- 4 6	
" Expenses on Mandir Samiti. (Bldg. Com.)	53,972-12-3	
Purchases of Articles	1,883- 6-9	
" Examinations.	1,825- 2-6	
" Books Editing Expenses.	679- 0-0	
" Office Management.	583- 7-0	
, Loan Returned.	6,000- 0-0	
" Advance (Narayan Press)	213-15-9	
" Bank Account		
M. P. Housing Socy.	5,000- 0-0	
M. P. Coop. Bank.	73-11-9	
Maharashtra Bank.	2,743- 0-9	
Maharashtra Bank. [Building Fund]	994-12-6	
		8,811- 9-0
" Fixed Deposits :-		
Balance.	3,000- 0-0	
Additions	500- 0-0	
		3, 500- 0-0
Closing Balance Cash in Hand.	15- 4-10	
Total Rs.	88,532-10-4	

CERTIFICATE :— Certified that the figures shown in the above Receipts & Peyments Statment of the Vidarbha Sahitya Sangh, Nagpur, agree with the books of accounts maintained which have been audited by us and are found to be correct.

Dated, Nagpur, the 21st April 1954.

Maheshwar Gadre & Co.
CHARTERED ACCOUNTANT

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मंदिर समिति, विदर्भ साहित्य संघ

दिनांक १–४–१९५३ ते ३१–३–१९५४ पर्यंतचा जमाखर्चाचा तक्ता.

जमा		खर्च	
आरंभीची शिल्लक	२१५–१४–६	टपाल आणि स्टेशनरी	४८–१०–९
मंदिर निधींतून एकूण काढलेली रक्कम	५३,९७२–१२–३	वेतन खर्च	१,३५०–१२–०
		प्रवास व वाहनव्यय	४७६– ६–०
		किरकोळ खर्च	२३१–११–९
		बांधकाम मजुरी	१६,०८५– ३–६
		वाळू	१,९८९– ३–०
		गिट्टी	२,४८९–१५–६
		स्टोन–मेटल (Stone Metal)	२,२६०–१०–६
		मुरूम आणि कच (Coal Ash)	१,४६९– ४–०
		लांकूड	३,४७९– ९–३
		विटा	३,५९३– ०–६
		सिमेंट	६,०६७–१०–६
		पोलाद	८,७९५– ६–०
		इमारतीचें सामान	१,७३४– ८–६
		फेन्सींग व. गार्डनिंग	६९५– ६–६
		नकाशे व रेखाचित्रें	२९–१२–०
		उत्सव खर्च	४७६– ६–६
		टेंपररी कन्स्ट्रक्शन	६४–१२–०
		वीज इन्स्टालेशन्स	२९३– ७–०
		वाटर पाइप लाइन	१७१– ४–०
		हत्यारें व अवजारें	२९५–१४–०
		आगाऊ अनामत (Advances)	२,०००– ०–०
		नगदी शिल्लक	९३–१३–०
एकूण	५४,१८८–१०–९		५४,१८८–१०–९

तपासलें व तें बरोबर आहे.

(सही) महेश्वर गद्रे आणि कंपनी
अधिकृत हिशेबनीस

नागपूर, दिनांक २१ अेप्रील १९५४.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

BUILDING COMMITTEE (Mandir Samiti)

VIDARBHA SAHITYA SANGH, NAGPUR.

Receipts & Payments Statement for the Period from 1 st Apr. '53 to 31 st Mar' 54.

Receipts		Payments	
Opening Balance.	215-14-6	Postage & Stationery.	44-10-9
Total Withdrawals From Building Fund A/c.	53, 972-12-3	Establishment.	1,350-12-0
		Travelling & Conveyance.	476-6-0
		Miscellaneous.	231-11-9
		Constructional Wages	16,085-3-6
		Sand.	1,989-3-0
		Bajri.	2,489-15-6
		Stone Metal.	2,260-10-6
		Murrum & Coal Ash.	1,469-4-0
		Timber.	3,479-9-3
		Bricks.	3,593-0-6
		Cement.	6,067-10-6
		Steel.	8,795-6-0
		Building Meterial	1,734-8-6
		Fencing & Gardening.	695-6-6
		Maps & Drawings.	29-12-0
		Ceremonies.	476-6-6
		Temporary Constructions.	64-12-0
		Electrical Installation.	293-7-0
		Pipe Line Fittings.	171-4-0
		Tools & Implements.	295-14-0
		Advances paid.	2,000-0-0
		Closing Balance.	93-13-0
Total Rs.	54, 188-10-9	Total Rs.	54,188-10-9

Dated, Nagpur,
The 21 st April 1954.

Checked & Found Correct.
S/d Maheshwari Gadre & Co.
Chartered Accountant

Ashok Mudranalaya Nagpur.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महत्त्वाची सूचना

विदर्भ साहित्यसंघाने यावर्षी मध्यप्रदेशांतील, मराठीच्या एका किंवा अनेक बोलींचें शास्त्रशुद्ध संशोधन करण्याचें योजिलें आहे. अशा प्रकारचें काम अंगावर घेण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनी आपलीं नांवें संघाध्यक्षांकडे देऊन चौकशी करावी. हें काम करूं इच्छिणारे संशोधक, मराठी विषय घेऊन एम्. ए. परीक्षेंत पहिल्या किंवा निदान दुसऱ्या वर्गात उत्तीर्ण झालेले व भाषाशास्त्राची विशेष आवड असलेले असावे. हें काम करण्यासाठी त्यांनी संपूर्ण वेळ देण्याचें व संशोधनाप्रीत्यर्थ अवश्य असल्यास प्रवास करण्याचें लेखी आश्वासन दिलें पाहिजे. या कामासाठी ज्या संशोधकाची निवड केली जाईल, त्या संशोधकास विदर्भ साहित्यसंघाकडून शिष्यवृत्ति देण्यांत येईल. संशोधनात्मक प्रबंध एक वर्षांत पुरा झाला पाहिजे. कामाला प्रारंभ १ जुलै १९५४ पासून केला पाहिजे.

ह. ना. नेने.

अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ, नागपूर

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ